रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ४५
www.ramprahar.com
गुरुवार, ३१ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

### 'सीरम'ला डेंग्यू, मलेरियावर लस बनविण्यात यश

**पुणे :** जगभरात जेव्हा कोरोनाने हाहाकार माजवला होता, तेव्हा भारताच्या सीरम इन्स्टिट्यूटने कोरोनाची लस तयार करून जगाला संजीवनी दिली होती. आता सीरम इन्स्टिट्यूटने डेंग्यू आणि मलेरिया या रोगांवर लस तयार करण्यात यश मिळवले आहे. वर्षभरात ही लस बाजारात उपलब्ध होणार आहे. सीरम इन्स्टिट्यूटचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक सायरस पूनावाला यांनी याबद्दल माहिती दिली आहे. पावसाळ्याच्या काळात डेंग्यू आणि मलेरिया रोगांचा लाखो लोकांना प्रादुर्भाव होतो, डेंग्यूमुळे काही लोक दगावलेही जातात. त्यामुळे अनेक वर्षांपासून सीरम इन्स्टिट्यूटचे शास्त्रज्ञ या रोगांवर लस शोधून काढण्याचा प्रयत्न करीत होते. या शास्त्रज्ञांना आता यश आले आहे. त्यामुळे आता नागरिकांनाही दिलासा मिळणार आहे.

## अंतरंग

राज्यात उद्यापासून आयुष्मान भव मोहीम/२
अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधमास जन्मठेप/३
पिंच्याक सिलॅट स्पर्धेत नवी मुंबईतील खेळाडूंचे वर्चस्व/८

# राज्यातील ७५ हजार गोविंदांना विमा कवच

## १८ लाख ७५ हजारांचा निधी मंजूर; राज्य सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

दहीहंडीचा उत्सव जवळ येत असल्याने राज्य सरकारने गोविंदांच्या विम्यासाठी १८ लाख ७५ हजारांचा निधी मंजूर केला आहे. ८ सप्टेंबरपर्यंत शासकीय विमा कवच लागू असणार आहे. याआधी ५० हजार गोविंदांना शासकीय विमा कवच देण्याचे ठरवले होते. त्यात २५ हजार गोविंदांची भर पडल्याने आता एकूण ७५ हजार गोविंदांना या विम्याचे कवच मिळणार आहे.

प्रो-गोविंदा दहिहंडी दरम्यान गोविंदाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास अथवा गंभीर जखमी झाल्यास हे शासकीय विमा कवच गोविंदांना लागू होणार आहे. ६ सप्टेंबरला जन्माष्टमी आहे, तर ७ सप्टेंबरला दहीहंडीचा उत्सव रंगणार आहे. त्याच अनुषंगाने हा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

शासकीय आदेश काढून राज्य सरकारने गोविंदांना शासकीय विमा कवच दिले आहे. या निर्णयानंतर ७५ हजार गोविंदांना शासकीय विमा कवच दिले आहे. प्रो-गेविंदा या शासकीय दहिहंडीकरीता हे विमा कवच दिले आहे.

दहीहंडीला खेळाचा दर्जा देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्याच वर्षी केली होती. राज्य सरकारने नोकऱ्यांमध्ये खेळाडूंना दिलेल्या पाच टक्के आरक्षणाचा लाभ आता गोविंदांनाही





मिळणार आहे. मृत्यू झाल्यास १० लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे, तर गंभीर जखमी झालेल्यांना ७.५० लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. हात-पाय जायबंदी झालेल्यांना पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्याच वर्षी केली होती. त्यानुसार, या वर्षासाठी गोविंदांच्या विमा कवच योजनेसाठी राज्य सरकारकडून निधी वर्ग करण्यात आला आहे.

२०१४पासून प्रो-लीग गोविंदा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार अशी मागणी होती, ती यंदा पूर्ण होत आहे. वरळी येथे डोम थिएटरमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. गुरुवारी (दि. ३१) मुंबई येथील वरळीच्या डोम या ऑडिटोरियममध्ये प्रो-गोविंदा स्पर्धेचे आयोजन राज्य समन्वय समितीद्वारे करण्यात येणार आहे.

# आदित्य एल-१ सूर्याच्या दिशेने झेपावण्यासाठी सज्ज

**श्रीहरीकोटा : वृत्तसंस्था**

चांद्रयान-३ ही मोहीम यशस्वी ठरल्यानंतर भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आता सूर्यावर स्वारी करण्याच्या तयारीत आहे. इस्रो आपले यान आदित्य एल-१ हे सूर्याच्या दिशेने पाठवणार आहे. पीएसएलव्ही या प्रक्षेपकाद्वारे शनिवारी (दि. २)सकाळी ११.५० वाजता हा उपग्रह सूर्याच्या दिशेने पाठवला जाईल. रॉकेटची प्रक्षेपण तालीम (लॉन्च रिहर्सल) आणि तपासणी पूर्ण झाल्याची माहिती 'इस्रो'ने बुधवारी (दि. ३०) दिली.



या सौरमोहिमेद्वारे 'इस्रो' सूर्याचा अभ्यास करणार आहे. सूर्याचे तापमान, अतिनील किरणांचा पृथ्वीवर होणारा परिणाम, ओझोनचा थर, अंतराळातील हवामान, सौरवादळे आणि त्याचा पृथ्वीवर होणारा परिणाम या सर्व गोष्टींचा अभ्यास केला जाणार आहे. या सौरमोहिमेसाठी 'इस्रो'च्या यू. आर. राव उपग्रह केंद्रात तयार केलेला उपग्रह दोन आठवड्यांपूर्वी आंध्र प्रदेशातील श्रीहरीकोटा येथील इस्रोच्या स्पेसपोर्टवर पोहचवण्यात आला आहे. येथूनच आदित्य एल -१ हे यान अवकाशात झेपावणार आहे.

भारत पहिल्यांदाच अंतराळात सूर्य निरीक्षण मोहीम लॉन्च करणार आहे. या मोहिमेला आदित्य एल -१ मिशन असे नाव देण्यात आले आहे. शनिवारी सकाळी ११.५० मिनिटांनी आंध्र प्रदेशातील श्री हरिकोटा इथल्या 'इस्रो'च्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून हे यान लॉन्च केले जाणार आहे. 'इस्रो'चे सर्वाधिक विश्वसनीय पीएसएलव्ही एक्सएल या रॉकेटच्या माध्यमातून हे यान सूर्याच्या दिशेने झेपावणार आहे.

# 'इंडिया'आघाडीची बैठक म्हणजे बारुद नसलेला बॉम्ब -बावनकुळे

**नागपूर : प्रतिनिधी**



'इंडिया' आघाडीची बैठक म्हणजे, बारुद नसलेला बॉम्ब अन् केवळ नाटक कंपनी आहे. सगळे नेते हॉटेलमध्ये राहून मुंबई फिरून निघून जातील, ना त्यांच्याकडे अजेंडा आहे, ना मुद्दे आहेत. फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात मोट बांधण्याच्या देखाव्यासाठी ते एकत्र येत आहेत. बैठकीला आलेल्या अनेक नेत्यांकडे मतदान नाही. यातील पक्षाचे किती मत महाराष्ट्रात आहे, ते दाखवा, आम्ही जिथे जिथे जात आहोत, लोक पंतप्रधान मोदींच्या नावाने सहभागी होत आहे. त्यामुळे ५१ टक्के मते महायुतील मिळतील, असा विश्वास भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ते नागपूरमध्ये बोलत होते.

बारामतीत महायुती जिंकणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे तिन्ही नेते मिळून बारामतीचा करेक्ट कार्यक्रम करतील, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

प्रकाश आंबेडकर यांना बोलवायचे की नाही हा निर्णय उद्धव ठाकरे यांचा निर्णय आहे, पण प्रकाश आंबेडकर यांची भूमिका काँग्रेस, राष्ट्रवादीला कधीच पटली नाही. काँग्रेसची भूमिका मागासवर्गीय विरोधी आहे. काँग्रेस पूर्वीपासून आंबेडकरविरोधी राहिली आहे. आधी काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विरोध केला. आता त्यांनी 'इंडिया'च्या बैठकीपासून प्रकाश आंबेडकर यांना दूर ठेवले. प्रकाश आंबेडकर यांनी जर का भाजपमध्ये येण्याची इच्छा व्यक्त केली तर त्यांचे आम्ही नक्कीच स्वागत करू.

# राज्यात लवकरच नवीन महाविद्यालये, परिसंस्था

## ■ बृहद आराखड्यास बैठकीत मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या क्षेत्रामध्ये उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये आणि परिसंस्था सुरू करण्यासाठी स्थळबिंदू निश्चित केले जातात. या स्थळबिंदू निश्चितीच्या २०२४ ते २०२९ या पंचवार्षिक बृहद आराखड्यास बुधवारी (दि. ३०) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) बैठकीत मान्यता देण्यात आली.

या आराखड्यानुसार यावर्षी राज्यात एक हजार ४९९ ठिकाणी महाविद्यालये सुरू करता येणार आहेत. महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास



आयोगाची (माहेड) बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमात राज्यात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वसमावेशक आणि समन्यायी वाटप करण्यासाठी महाविद्यालये आणि परिसंस्थांची स्थाने निश्चित करण्याची कार्यपद्धती ठरवून देण्यात आली आहे. विद्यापीठाने दर पाच वर्षांनी तयार केलेल्या सर्वसमावेशक सम्यक योजनेस महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची मान्यता घेण्यात येते. त्यानुसार सम्यक योजनेशी अनुरुप २०२४-२५ च्या वार्षिक योजना प्रस्ताव आणि सन २०२४ ते २९ या पंचवार्षिक योजनेच्या बृहद आराखड्यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

२०२४ ते २०२९ या पंचवार्षिक स्थळबिंदू आराखड्यामध्ये १५३७ नवीन प्रस्तावित ठिकाणे होती, त्यापैकी १४९९ ठिकाणे पात्र ठरली असून या आराखड्याला मान्यता देण्यात आली. २०१९ ते २०२४ या पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये १०५९ स्थळबिंदूंचा समावेश होता. विद्यापीठांकडून ३१९३ नवीन प्रस्ताव आयोगाकडे सादर करण्यात आले होते, त्यातील २८१९ स्थळ बिंदूंना 'माहेड'ने मान्यता दिली होती. गेल्या पाच वर्षात ५९३ नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता देण्यात आल्या आहेत.

बैठकीत राज्यातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत प्रधान सचिव रस्तोगी यांनी माहिती दिली. शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाधान व्यक्त केले. देशात सर्वाधिक विद्यापीठे आणि महाविद्यालयांना महाराष्ट्रात नॅक मानांकन मिळाले आहेत, मात्र कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनीदेखील नॅक मानांकन मिळविण्यासाठी राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेकडे नोंदणीची कार्यवाही करण्याविषयी चर्चा करण्यात आली.

## निवडक

### 'प्रज्ञान'ला चंद्रावर आढळला ऑक्सिजन

**श्रीहरीकोटा :** चांद्रयान-३ मोहिमेत चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील पृष्ठभागावर ऑक्सिजनसह काही मूलद्रव्ये आढळली आहेत. प्रज्ञान रोव्हवरील लेझर-प्रेरित ब्रेकडाउन स्पेक्ट्रोस्कोपी (एलआयबीएस) उपकरणाने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील पृष्ठभागावर इन-सीटू मोजमाप केले तेव्हा हा शोध लागला आहे.

### आरोपीला वाचवण्यासाठी पोलिसांवर दगडफेक

**कल्याण :** कल्याणमध्ये इराणी नागरिकांकडून मुंबई पोलिसांवर दगडफेक करण्यात आल्याची घटना घडली आहे. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून याबद्दलचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. डीएन नगर पोलीस ठाण्यातील संशयित आरोपी आंबिवली परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला होता. तेथील इराणी नागरिकांना याची माहिती मिळताच त्यांनी पोलिसांवर दगडफेक करण्यास सुरुवात केली, पण पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले.

# जागतिक तिरंदाजी स्पर्धेत ओजसला पाच 'सुवर्ण'

## आज रयत शिक्षण संस्थेकडून साताऱ्यात सन्मान

**सातारा : प्रतिनिधी**

येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे घटक महाविद्यालय असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजला बी. ए. भाग १ या वर्गात शिकत असणाऱ्या ओजस प्रवीण देवताळे याने नुकत्याच झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत पुरुष वैयक्तिक व सांघिक स्पर्धेत भारताला दोन सुवर्णपदके मिळवून दिली. त्याचसोबत म्युनिच, जर्मनी येथे झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत वैयक्तिक पुरुष गटात सहभागी होऊन सुवर्णपदक प्राप्त केले. हा बहुमान मिळवणारा तो प्रथम भारतीय आहे.




पॅरिस फ्रान्स येथे झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय पुरुष संघाने सांघिक गटात सुवर्णपदक मिळविले. या संघात ओजसचा समावेश होता. आजपर्यंत आंतरराष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेतील एकूण पाच सुवर्णपदके आणि अनेक राष्ट्रीय पदके ओजसने मिळविली असून यामध्ये ज्युनियर वर्ल्डकपमधील आणि आशियाई स्पर्धेतील सुवर्ण पदकांचाही समावेश आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या आशियाई व पुढील वर्षी होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी त्याचा सध्या सराव सुरू आहे. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन केले. त्याचे अभिनंदन करण्यासाठी ओजस व त्याचे मार्गदर्शक प्रवीण सावंत यांची गुरुवारी (दि. ३१) भव्य मिरवणूक छत्रपती शिवाजी कॉलेज ते कर्मवीर समाधी परिसर अशी आयोजित करण्यात आली आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून ओजस व त्याचे मार्गदर्शक यांना सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे व जिमखाना विभाग प्रमुख प्रा. विक्रम ननावरे यांनी दिली.

# कापूस, सोयाबीनसाठी ५२४ कोटींचा आराखडा सादर करण्याच्या सूचना

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या अर्थसंकल्पात सोयाबीन आणि कापूस पिकांसाठी सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या तीन वर्षांच्या कालावधीत एक हजार कोटींची विशेष कृती योजना राबवण्यासंदर्भात घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ आणि मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा आढावा कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेतला.

दरम्यान, कापूस सोयाबीन आणि इतर गळीत धान्य उत्पादनात आघाडीवर असलेले जिल्हे निवडून त्या जिल्ह्यांमध्ये हे सर्व कार्यक्रम युद्धपातळीवर राबवावेत, तसेच यासाठी चालू आर्थिक वर्षात ५२४.१९ कोटी निधीचा आराखडा तत्काळ सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

# पिंपरी चिंचवडमध्ये दुकानाला भीषण आग

## एकाच कुटुंबातील चौघांचा होरपळून मृत्यू

**पुणे : प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडमधील चिखली भागातील एका हार्डवेअरच्या दुकानाला बुधवारी (दि. ३०) भीषण आग लागली. या भीषण आगीत चार जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन लहानग्यांचा समावेश आहे.




बुधवारी पहाटेच्या सुमारास चिखलीमधील सचिन हार्डवेअरला आग लागली. याच हार्डवेअरमध्ये कुटुंब वास्तव्यास होते. ही आग इतकी भीषण होती की, आगीत चार जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. चिमणाराम बेणाराम चौधरी (वय ४८), नम्रता चिमणाराम चौधरी (वय ४०), भावेश चिमणाराम चौधरी (वय १५) व सचिन चिमणाराम चौधरी (वय १३) अशी मृतांची नावे आहेत.

या आगीची माहिती मिळताच इमारतीचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. त्यानंतर महावितरणच्या अभियंता व कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यात महावितरणकडून दुकानात लावलेल्या मीटरपर्यंत वीजपुरवठा सुरळीत असल्याचे तसेच वीजमीटर व सर्व्हिस वायर सुस्थितीत असल्याचे निदर्शनास आले. यंत्रणेमधून कोणत्याही प्रकारचे शॉर्टसर्किट झाले नसल्याचे या प्राथमिक पाहणीत आढळले आहे. त्यामुळे आग नक्की कशामुळे लागली याचा तपास सुरू आहे.

# कोळी बांधवांकडून नारळी पौर्णिमेनिमित्त समुद्राला नारळ अर्पण





**अलिबाग : प्रतिनिधी**

बहिण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधनाचा सण रायगडात पारंपरिक पद्धतीने साजरा झाला. त्याचप्रमाणे नारळी पौर्णिमेनिमित्त कोळीवाड्यामध्ये उत्साह पहायला मिळाला.

रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला बाजारपेठेत राखी खरेदीसाठी महिलांची विशेष गर्दी होती. ऐन सणाच्या हंगामात पावसाने विश्रांती घेतल्याने बच्चेकंपनी, प्रौढ मंडळींनी अत्यंत उत्साहात रक्षाबंधन साजरे केले. भावाच्या मनगटावर राखी बांधत बहिणींनी त्यांचे औक्षण केले व त्यांच्या रक्षणाच्या जबाबदारीची आठवण करून दिली. घरोघरी नारळी भाताचा बेत होता.

नारळी पौर्णिमेनिमित्त ठिकठिकाणी नारळ फोडीच्या स्पर्धा रंगल्या होत्या. तालुक्यात रेवस, मांडवा, बोडणी, सासवणे, अलिबाग, चेंढरे, किहीम, रेवदंडा आदी ठिकाणी या नारळ फोडीच्या स्पर्धा पहायला मिळाल्या. मांडवा समुद्रकिनारी दरवर्षीप्रमाणे यंदाही वाळूतील कुस्त्यांचा फड रंगला होता. स्थानिक मल्लांबरोबरच राज्यभरातील नावाजलेले मल्ल आखाड्यात उतरले होते.

नारळी पौर्णिमेनिमित्त कोळीवाड्यांमध्ये उत्साहाला उधाण आले होते. कोळी बांधवांनी आपल्या होड्या सजवल्या होत्या. ठिकठिकाणच्या कोळीवाड्यांमधून संध्याकाळी सोन्याने मढवलेल्या नारळाची मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वेषभूषा करून कोळी बांधव-भगिनी लहान मुले या मिरवणूकीत सहभागी झाले होते.

ढोल-ताशा, बॅन्ड पथक अशा वाद्यांच्या तालावर नाचत थिरकत या मिरवणुका समुद्रकिनारी पोहचल्या तेथे नारळाची आणि सागराची गारहाणे घालत विधीवत पूजा करून समुद्राला नारळ अर्पण करण्यात आला.

## सण अतूट नात्याचा..!



(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल :** भावा-बहिणीच्या नात्याचे प्रतीक आणि स्नेह, प्रेम आणि आपुलकी अशा मिश्र भावनांचा रक्षाबंधन हा सण आहे. या सणानिमित्त बहिण आपल्या भावाला राखी बांधून रक्षण करण्याचे वचन घेते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना त्यांच्या भगिनी अनुसया वास्कर, राधाताई ठाकूर, चंद्रभागा घरत, रत्नप्रभा घरत, प्रमिला वास्कर यांनी राखी बांधून सण साजरा केला.

# राज्यात उद्यापासून ‘आयुष्मान भव’ मोहीम

## आबालवृद्धांची होणार आरोग्य तपासणी; आरोग्याविषयक करणार जनजागृती

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार येत्या १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत राज्यात आयुष्मान भव ही आरोग्यविषयक मोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी जिल्हापातळीवर बैठकांचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये आबालवृद्धांच्या तपासण्या करण्यात येणार आहेत.



आयुष्मान आपल्या दारी ३.० या उपक्रमामध्ये सर्व जिल्ह्यांमधील पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करून आयुष्मान कार्डांचे वितरण करण्यात येणार आहे. आयुष्मान सभा उपक्रमामध्ये आरोग्यविषयक सेवासुविधांची जनजागृती करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या सहकार्याने मेळावे घेण्यात येणार आहेत. आयुष्मान कार्ड व आभा कार्ड याबाबत जनजागृती, आरोग्यवर्धिनी केंद्रांमार्फत असंसर्गजन्य रोग, सिकलसेल, लसीकरण व क्षयरोगाबाबत जागृती करण्यात येणार आहे.

मधुमेह, ताणतणाव, रक्तदाब, विविध प्रकारचे कॅन्सर, कुष्ठरोग, क्षयरोग, कुपोषण, नेत्रचिकित्सा याबाबत चार आठवड्यांमध्ये तपासणी करण्यात येणार आहे. कम्युनिटी हेल्थ सेंटरच्या पातळीवर वैद्यकीय महाविद्यालयांच्या माध्यमातून आठवड्याला एक आरोग्य मेळावा घेण्यात येईल.

**अंगणवाडी, प्राथमिक शाळांतील मुलांची तपासणी :** ***याच दरम्यान सर्व अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील मुलांची विशेष मोहीम राबवून आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. या मुलांची ३२ सामान्य आजारांची तपासणी आणि उपचार करण्यात येणार आहेत. आवश्यकता भासल्यास या मुलांच्या जिल्हास्तरावर शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, त्यांना आवश्यक उपयुक्त साहित्य देण्याच्याही सूचना देण्यात आल्या आहेत.***

# शिक्षक परिषदेची प्रलंबित प्रश्न सोडविण्याची मागणी

**अलिबाग, माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या शिष्टमंडळाने राज्याचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात महाराष्ट्र राज्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन शिक्षकांच्या प्रश्नांविषयी चर्चा करण्यात आली.



या भेटीमध्ये राज्यातील शिक्षकांच्या समस्ये संदर्भात चर्चा करण्यात आली. चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील शिक्षकांच्या असलेल्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात मी व्यक्तिशः लक्ष घालून शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यासाठी प्रयत्न करेन, असे आश्वासन शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाला दिले आहे. शिष्टमंडळात रायगड जिल्हाध्यक्ष विजय पवार, वैभव कांबळे, संजय कोंडविलकर यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# फडके विद्यालयातील विद्यार्थिनींनी बांधल्या पोलीस बांधवांना राख्या




**पनवेल : प्रतिनिधी**

पोलीस बांधवांचे कार्य तसेच समाजसेवा लक्षात घेता त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नवीन पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागातील आरएसपीच्या विद्यार्थ्यांकडून सामाजिक रक्षाबंधन उपक्रमांतर्गत कळंबोली येथील पोलीस मुख्यालयातील पोलीस बांधवांना राखी बांधून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

विद्यालयातील ५० विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नवी मुंबई पोलीस मुख्यालयात रक्षाबंधनाचे औचित्य साधून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उपस्थित होते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने मेळघाटमधील आदिवासींकडून हे राखी बनवण्याचे पर्यावरणपूरक बांबूयुक्त साहित्य विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने आणि आवडीने या सर्व राख्या सामाजिक रक्षाबंधन या उपक्रमांतर्गत स्वतः तयार केल्या आणि सृष्टी बंध आणि स्नेहबंध जपण्याचा प्रयत्न केला. पोलीस निरीक्षक शांताराम वाघमोडे यांनी सामाजिक रक्षाबंधन या उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना रहदारीचे व वाहतुकीचे नियमांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्रीडा प्रमुख संपत्ती केळकर यांनी आखाड्यात प्रात्यक्षिकांद्वारा कुस्ती क्रीडा प्रकाराबाबत विस्तृत माहिती दिली. जिमखाना व बास्केटबॉलचे मैदान दाखवून पोलीस मुख्यालयातील विविध विभागांची माहिती देण्यात आली.

विद्यालयाच्या क्रीडा शिक्षक वैभवी मराळ यांनी या रक्षाबंधनासाठी वापरल्या जाणाऱ्या राख्या मेळघाट येथील आदिवासी लोकांना मदतीचा हात देण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेला छोटासा प्रयत्न असल्याचे सांगून पोलीस निरीक्षकांचे तसेच इतर पोलीस बंधू-भगिनींचे सामाजिक रक्षाबंधन उपक्रम राबवण्यासाठी संधी दिल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने आभार मानले.

रक्षाबंधन व संस्कृतदिन या दुग्ध शर्करा योगाचे औचित्य साधून विद्यालयात संस्कृत भाषेत रक्षाबंधनाविषयी कविता, गाणे तसेच संस्कृतदिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी सादर केले. संस्कृत भाषेतील रक्षाबंधनाच्या गाण्यांच्या तालावर विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या. मुख्याध्यापिका मनीषा महाजन यांनी सामाजिक रक्षाबंधन या उपक्रमांतर्गत घेतलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक करून विद्यार्थ्यांना स्नेहबंध व सृष्टी बंध जपण्याचे आवाहन केले. पालक प्रतिनिधीसुद्धा या उपक्रमात सहभागी झाले होते.

# संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे मंगळागौरी

**पनवेल : प्रतिनिधी**

संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलतर्फे घागर घुमू दे मंगळागौरीच्या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी पनवेल, कामोठे, कळंबोली, खांदेश्वर, देवद, विचुंबे, खारघर, कळंबोली, मुंबई, नवी मुंबई कोपरखैरणे, डोंबिवली, बदलापूर, पेण, अलिबाग, नागोठण्यावरूनही मैत्रीणींनी खास मंगळागौर खेळण्यासाठी १०५ महिलांनी पनवेल नगरीत हजेरी लावली होती.



महिलांना स्पर्धामुक्त मंगळागौरीचा आनंद मिळतो कारण उत्कृष्ट कामगिरीबद्दल बक्षिसे, ट्रॉफी तर मिळाली पण कोणतीही स्पर्धा न ठेवता. त्यामुळे खेळतांना महिलांच्या मनात कोणतिही इर्षा, स्वार्थ आणि चढाओढ नव्हती. खेळात स्पर्धा नसावी, पैशांपेक्षा किंवा कोणत्याही भेटवस्तूपेक्षा हा निखळ आनंद अतिशय मोलाचा आहे, पण हल्ली सर्व सणांना कार्यक्रमाला स्पर्धा आणि बाजारीकरण असे काहीतरी विचित्र स्वरूप देऊन त्यातील स्वात्विकताच निघून गेली आहे आणि आपण निखळ आनंद आजकाल हरवून बसलो आहोत.

दरवर्षी वेगळे काहीतरी महिलांना देण्याचा प्रयत्न आमची संवेदना संस्था नेहमीच करीत असते. सामाजिक जाणिवांचे भान नवीन-जुन्याचा मेळ घालून मंगळागौरीच्या पारंपरिक खेळाबरोबरच पर्यावरणस्नेही जीवन पद्धतीचा अवलंब हा विषय मंगळागौरीच्या खेळातून या वर्षी मांडण्यात आला, असे संस्थेच्या संस्थापिका अध्यक्ष सुनेत्रा गवाणकर यांनी सांगितले.

या वर्षीचा संवेदना श्रावणक्विन २०२३ हा मानाचा पुरस्कार प्रेरणा गायकवाड हिला मिळाला, तर बेस्ट अटायर वृषाली थोरात, बेस्ट प्रॉप अश्विनी सावले, बेस्ट हेअर स्टाईल नंदिनी गावंड, बेस्ट ज्वेलरी स्वप्नाली मोरे, बेस्ट स्माईल स्मिता अनूगडे, बेस्ट मेकअप नंदिनी वेरनेकर, बेस्ट एक्सप्रेशन रुपाली पाटील, बेस्ट प्रेझेंटेशन प्रभा पाटील, बेस्ट उखाणा मेधा गाडगी यांनी पटकाविला.



**पनवेल : रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांनी पोलीस ठाण्यातील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या साथीने रक्षाबंधन सण साजरा केला.** (छाया : संजय कदम)

# दक्षिण मध्य मुंबईतील भगिनींसोबत आमदार प्रसाद लाड यांचे रक्षाबंधन

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपचे नेते आमदार प्रसाद लाड यांनी दक्षिण मध्य मुंबईतील हजारो महिला आणि भगिनींसोबत रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

सोहळा सामाजिक रक्षाबंधनाचा, जागर अभेद्य हिंदू एकतेचा! आमदार प्रसाद लाड यांनी रक्षाबंधनाचा हा उत्सव साजरा केला असून, या वेळी त्यांच्या पत्नी नीता प्रसाद लाड, भाजप जिल्हाध्यक्ष राजेश शिरवाडकर, माजी नगरसेविका राजेश्री शिरवाडकर यांच्यासह भाजपचे नेते व पदाधिकारी उपस्थित होते.



रक्षाबंधनाच्या या कार्यक्रम प्रसंगी दक्षिण मध्य मुंबईतील एक हजारपेक्षा अधिक भगिनींनी आमदार प्रसाद लाड यांना राखी बांधली. रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, देशातील सर्व एलपीजी गॅस धारकांना २०० रुपये सबसिडी तसेच उज्वला योजनेतील महिलांना एकूण ४०० रुपये सबसिडी देऊन, रक्षाबंधनाची अनोखी भेट दिली आहे, तसेच येत्या काळात असे अनेक लाभ महिलांना मिळणार आहेत, असे आमदार लाड यावेळी म्हणाले. त्याचप्रमाणे माझ्या या माता भगिनींना ज्या ठिकाणी गरज असेल, तिथे हा त्यांचा दादा, त्यांच्या पाठीशी उभा असेल, असे आश्वासन आमदार प्रसाद लाड यांनी या वेळी दिले आहे.

# उरण महाविद्यालयाचे युवा महोत्सवात यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या रायगड झोन सांस्कृतिक युवा महोत्सवात कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. महाविद्यालयातील एकूण ३१ विद्यार्थ्यांनी या महोत्सवात सहभाग नोंदवला.

या स्पर्धेमध्ये मेहंदी स्पर्धेत मोफिया शेख प्रथम, रांगोळी स्पर्धा काजल शर्मा द्वितीय, हिंदी वक्तृत्व स्पर्धा मोहम्मद मुकादम तृतीय, हिंदी वादविवाद स्पर्धा सिद्धी म्हात्रे, दीपिका सोनी प्रथम, लोकनाट्य स्पर्धेत भूमिका वाडकर, मृणालिनी पाटील, साक्षी म्हात्रे, साक्षी पाटील, शीतल बागुल, श्रुती धुमाळ, श्रुती बेन राहुल, मनीषा भरणे, मथुरा शेंडगे, नेहा शामेली, श्रुतीबेन रावल, कथा नाईक यांचा सहभाग होता.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड, प्रा. किशोर शामा, प्रा. व्हि. एस. इंदुलकर, प्रा. डॉ. ए.आर.चव्हाण, तानाजी घ्यार यांनी अभिनंदन केले व अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. कारुळकर, प्रा. डॉ. लोणे, प्रा. गायकवाड, प्रा. कांबळे, प्रा. पठाण, प्रा. शेख यांनी मार्गदर्शन केले.

# करंजा विद्यालयात नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील करंजा येथील द्रोणागिरी हायस्कूल इंग्रजी माध्यम करंजाविद्यालयात रक्षाबंधन आणि नारळी पौर्णिमा हा सण बुधवारी (दि.३०) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



हा सण विद्यालयात दरवर्षी साजरा करण्यात येतो. त्या प्रमाणे इ. पहिली ते सातवीचे काही विद्यार्थी पारंपरिक कोळी गणवेश परिधान करून आली होती. रक्षाबंधन हा सण असल्याने प्रत्येक वर्गात रक्षाबंधन केले जाते त्यानुसार वर्गातील मुलांना त्या वर्गातील मुलींच्या हस्ते प्रत्येक मुलाला राखी बांधून एकमेकांना ओवाळणी करण्यात आली.

वसुंधरेचे रक्षणकर्ते झाडे आहेत हे विद्यार्थ्यांना माहित व्हावे यासाठी दरवर्षी विद्यालयाच्या आवारात असणाऱ्या झाडांना राखी बांधली जाते. त्यानुसार विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रभु मॅडम आणि सर्व शिक्षकांनी झाडांना राख्या बांधल्या.

नारळी पौर्णिमाच्या सणानिमित्त विद्यालयात विद्यार्थ्यांनी नारळाची प्रतिमा तयार केली होती. या प्रतिमेचे पूजन करंजा मच्छिमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मराठी माध्यमाचे चेअरमन सिताराम नाखवा, करंजा मच्छिमार सोसायटीचे व्हाइस चेअरमन राजेंद्र नाखवा, माजी चेअरमन के. एल. कोळी तसेच करंजा मच्छिमार सोसायटीचे इतर सदस्य उपस्थित होते.

# ‘प्राणिक हिलिंग’बाबत उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

मैत्रेय प्राणिक हिलिंग सेंटरच्या माध्यमातून प्राणिक हीलिंग उपचारसंबधी माहिती आणि हिलिंगचा प्रत्यक्ष अनुभव उपक्रम कार्यक्रम शहरातील गोखले सभागृहात आयोजित परिणीता सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आलेल्या रक्षाबंधन विशेष प्रदर्शनावेळी राबवण्यात आला.



रक्षाबंधन या सणाचे औचित्य साधून परिणीता सोशल फाउंडेशनच्या वतीने परिणीता शॉपी रक्षाबंधन स्पेशल या प्रदर्शनामध्ये मैत्रेय प्राणिक हिलिंग सेंटरतर्फे प्राणिक हिलिंग उपचारसंबधी माहिती आणि हिलिंगचा प्रत्यक्ष अनुभव उपस्थित स्टॉलधारकांना देण्यात आला. याबद्दल सर्व स्टॉलधारकांनी समाधान व्यक्त केले आणि अधिक माहिती जाणून घेण्याची उत्सुकता दर्शविली. या वेळी परिणीता फाउंडेशनचे प्रशांत आणि साक्षी सागवेकर यांनी या प्रदर्शनात सहभागी झालेल्यांना एकप्रकारे रक्षाबंधनची भेटच दिली. अशा प्रकारचा प्राणिक हिलिंगचा कार्यक्रम तुम्हालाही कोणत्या सोसायटी, मंडळ तसेच संघटनेसाठी करायचा असेल तर आम्हाला संपर्क करा.

हा कार्यक्रम संपूर्णपणे मोफत असून कोणतेही छुपे शुल्क घेतले जात नाही, अशी माहिती मैत्रेय प्राणिक हीलिंग सेंटरच्या मेघना संजय कदम यांनी दिली तसेच अधिक माहितीसाठी (८३६९७६५९०७) येथे संपर्क साधण्याचे आवाहन केले.

# अखिल महाराष्ट्र गुरव समाज विद्यार्थी गुणगौरव समारंभ उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

अखिल महाराष्ट्र गुरव समाज (मुंबई) आयोजित विद्यार्थी व मान्यवरांचा गुणगौरव कार्यक्रम त्याचबरोबर संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नवी मुंबई येथील शेतकरी समाज मंदिर हॉल कोपरखैरणे येथे रविवारी (दि. २७) झाली. या वेळी राष्ट्रीय गुरव समाज प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब शिरसागर हे उपस्थित होते.



सर्वसाधारण सभेच्या कार्यप्रणालीमधून प्रोसिडिंग वाचन, जमाखर्च संस्थेची या पुढील दिशा याबाबत संस्थेचे अध्यक्ष विजय क्षीरसागर यांनी या सभेचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय गुरव समाज महासंघ कार्याध्यक्ष नवल शेवाळे, गुरव समाज रायगड, ठाणे, मुंबई संस्था अध्यक्ष बंडू खंडागळे, मनोज गुरव सर, तानाजी गुरव, रोहिदास देवाडे, शंकर कोंडीबा शिरसागर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी गुणगौरव त्याचबरोबर विशेष सत्कारमूर्तींचे संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी गुरव समाज रायगड मुंबई संस्थेचे कार्याध्यक्ष विजय साळुंखे, उपाध्यक्ष किशोर गुरव, सहखजिनदार संजय मोरे, गुरव विकास प्रतिष्ठान कार्याध्यक्ष रवींद्र गुरव उपस्थित होते.

# खारघरमधून सहा बांगलादेशींना अटक

## बेकायदा वास्तव्यप्रकरणी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर-३ मधील बेलपाडा गावात बेकायदा वास्तव्यास असलेल्या सहा बांगलादेशी नागरिकांना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने अटक केली आहे. यात चार पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे. सर्व बांगलादेशी नागरिक मागील सात ते आठ महिन्यांपासून खारघर येथे वास्तव्यास असल्याचे चौकशीत उघड झाले.



या कारवाईत अटक केलेल्यांमध्ये अलिम गुलाब सिंकदर (४४), मोहम्मद अश्रम काझी (५७), सलमा बेगम मोहम्मद काझी (४५), होसरुल रतुन मुल्ला (४५), शकिल होसरुल मुल्ला (१९) व माबिमा बेगम होसरुल मुल्ला (३८) या सहा जणांचा समावेश आहे. हे सर्वजण खारघर सेक्टर-३ मधील बेलपाडा गावात लक्ष्मण म्हात्रे यांच्या घरात बेकायदा राहत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल आहेर यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलम पवार व त्यांच्या पथकाने खारघरमधील बेलपाडा गावातील लक्ष्मण म्हात्रे यांच्या संशयित घरावर छापा मारला. या वेळी तेथे चार पुरुष आणि दोन महिला अशा एकूण सहा बांगलादेशी नागरिक बेकायदा राहत असल्याचे आढळले.

पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी काही महिन्यांपूर्वी बांगलादेशातून विनापासपोर्ट वैध कागदपत्रांशिवाय घुसखोरीच्या मार्गाने बेकायदा भारतात प्रवेश केल्याचे आढळून आले. तसेच ते खारघरमधील बेलपाडा गावात सात ते आठ महिन्यांपासून वास्तव्यास असल्याचे आढळून आले. त्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने सर्व बांगलादेशी नागरिकांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात विदेशी व्यक्ती अधि तसेच पारपत्र अधिनियमानुसार गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधमास जन्मठेप

**उरण : प्रतिनिधी, पनवेल : वार्ताहर**

उरण तालुक्यातील डाऊरनगर येथील १३ वर्षीय अल्पवयीन बालिकेला जीवे ठार मारण्याची धमकी देऊन बलात्कार करणारा नराधम आरोपी रमेश दादा कालेल (वय २२) याला पनवेल येथील अतिरिक्त सहजिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती सहिदा शेख यांनी आरोपी रमेश कालेल याचे विरोधात काल खटल्याची अंतिम सुनावणी घेऊन त्यास जन्मठेप व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा थोठावली आहे.

२९ नोव्हेंबर २०१८ रोजी आरोपी रमेश दादा कालेल (वय २२, रा. तानाजी तुकाराम यांची चाळ डाऊरनगर, उरण, मूळ रहिवाशी म्हसवड, जांभोळी, माण, सातारा) याने येथील १३ वर्षीय मुलीला आरोपीने त्याचे घरी बोलावून घेऊन, घराचा दरवाजा बंद करून, मुलीस जीवे ठार मारण्याची धमकी देऊन, मुलीचे इच्छेविरुद्ध शारिरीक संबंध ठेऊन मुलीस घरात डांबून ठेवल्या बाबतची तक्रार उरण पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.

या गुन्ह्याप्रकरणी तपास उरण पोलीस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक ए.एल. शिरोळे व पो. उपनिरीक्षक रुपाली चौधरी यांनी करून गुन्ह्यातील आरोपी रमेश कालेल याला तत्काळ अटक करण्यात आली होती. तपास अधिकाऱ्यांनी गुन्ह्यातील आरोपी रमेश कालेल याचे विरुद्ध परिस्थिती जन्य व वैद्यकीय पुरव्यांसह,साक्षीदार यांच्याकडे तपास करून आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा करून आरोपी विरुद्ध न्यायालयात दोषारोप सादर केले होते.

खटल्याचा निकाल पनवेल येथील अतिरिक्त सह जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती साहिदा शेख यांनी अंतिम युक्तिवादा नंतर दिला असून, आरोपी रमेश दादा कालेल या नराधमास अल्पवायीन मुलीवर बलात्कार प्रकरणी जन्मठेप व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा थोठावली आहे.

# बस, रिक्षाचालकांना भाजप महिलांनी बांधली राखी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप महिला मोर्चा पनवेल तालुका आणि शहर मंडळाच्या वतीने भावा-बहिणीच्या नात्याचे प्रतिक असलेला रक्षाबंधन सण पनवेल बस आगातील चालक तसेच रिक्षा बांधवांसोबत मंगळवारी (दि. २९) साजरा करण्यात आला.

बहीण-भावांमधील प्रेम वृद्धिंगत करणारा, नातेसंबंध दृढ करणारा आणि सुदृढ भावबंधाचे रेशीम धागे असेच घट्ट राहोत, याचा शाश्वत आशावाद देणारा सण म्हणजे रक्षाबंधन. या सणा निमीत्त भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या रायगड जिल्हाध्यक्षा अश्विनीताई पाटील, पनवेल तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत आणि शहर अध्यक्षा वर्षा



नाईक यांनी पनवेल एसटी स्टँण्डमधील बस चालक आणि रिक्षाबांधवांना राखी बांधून साजरा केला.

या वेळी महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अश्विनीताई पाटील, पनवेल तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत, जिल्हा संयोजीका संध्या शरबिद्रे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, पनवेल शहर अध्यक्षा वर्षा नाईक, सरचिटणीस लिना पाटील, उपाध्यक्ष निता मंजुळे, माजी नगरसेविका सिद्धीका पुंजानी, नलिनी शेलार, खांदा कॉलनी महिला मोर्चा सरचिटणीस आशा मुंडे, मनिषा निकम यांच्यासह बस चालक आणि रिक्षा बांधव उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात योग शिबिर; क्रीडा दिनाचे औचित्य

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर-ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. २९) राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरासाठी केंद्रिय राखीव पोलीस दलाचे जवान व योग शिक्षक श्री. राजकुमार उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी योगासनांचे विविध प्रकार केले. श्री. राजकुमार यांनी विद्यार्थ्यांना नियमित योगासनांचे महत्त्व पटवून दिले. या वेळी विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री. जाधव यांनी मेजर ध्यानचंद यांचा जीवन परिचय करून दिला. गतवर्षी जिल्हा क्रीडा स्पर्धांमध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

या योग शिबिराचे आयोजन उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या नायर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. योग शिबीराचे नियोजन विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. खांदेकर, श्री. जाधव, श्री. जोगदंडे व सौ. पवार यांनी यशस्वीपणे केले.





पनवेल : रक्षाबंधन सणानिमित्त श्रीधरशेठ ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, कान्हाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, नारायण ठाकूर, पंढरीनाथ ठाकूर, अवी ठाकूर यांना अनुसया वास्कर, राधाताई ठाकूर, चंद्रभागा घरत, रत्नप्रभा घरत, प्रमिला वास्कर या बहिणींनी राखी बांधून रक्षांधन सण साजरा केला.



कामोठे : भाजपच्या कामोठे मंडलतर्फे नवीन मतदार नोंदणी आणि मोफत आभा कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. या शिबिराला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली होती. या वेळी त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले.




पनवेल : विधानसभा निवडणूक प्रमुख तथा भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांचा वाढदिवस अभीष्टचिंतन सोहळा मंगळवारी आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्षा वर्षा नाईक, माजी नगरसेविका दर्शना भोईर, नीता माळी, सरचिटणीस लिना पाटील, भाजप युवा नेते केदार भगत, उमेश इनामदार, पत्रकार संजय कदम, सुमित दसवंते प्रसाद म्हात्रे, नितेश भगत, हर्षद गडगे, भावेश शिंदे, संतोष वर्तले, चेतन डुकरे व केदार भगत मित्र परिवार आदींनी नितीन पाटील यांना शुभेच्छा दिल्या.



पनवेल : रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभुमीवर स्पेशल वस्तूंचे प्रदर्शन परिणीता सोशल फाऊंडेशनच्या वतीने भरवण्यात आले होते. हे प्रदर्शन सोमवारी आणि मंगळवारदरम्यान गोखले हॉलमध्ये झाले असून या या प्रदर्शनाला माजी पं. स. सदस्य तथा भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत यांनी मंगळवारी भेट दिली. या वेळी महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा वर्षा नाईक, पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, सरचिटणीस लिना पाटील, साक्षी सागवेकर आदी उपस्थित होते.

## पनवेलमधून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून एक तरुणी कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रियांका रघुनाथ तांडेल असे या तरुणीचे नाव आहे. तिची उंची ५.१ फुट, रंग गोरा, केस लांब काळे, अंगाने मध्यम, अंगात काळा टि शर्ट व पॅन्ट आहे. या तरुणीबाबत माहिती असल्यास त्यांनी तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा नाईक सचिन होळकर यांच्याशी संपर्क साधावा.

# पोलिसांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रक्षाबंधन एक अनमोल बंधन भारतीय जनता पक्षप्रणित, स्त्रिसंवाद महिला बचत गट, सेक्टर ३, ४ व बेलपाडा यांनी खारघर पोलीस ठाण्यामध्ये पोलीस बांधवाना राखी बांधुन रक्षाबंधन साजरा केला.

सणासुदीलाही सुटीअभावी पोलिसांना रक्षाबंधनसारखे सण साजरे करता येत नाही. कर्तव्य दक्ष पोलीस सदैव आपले रक्षण करतात, म्हणून या रक्षाबंधन पूर्व संध्येला सख्ख्या भावाला राखी बांधण्या पूर्वी पोलीस स्टेशनमध्ये



जाऊन, सर्व पोलीस बांधवांना राखी बांधून, त्यांच्या प्रतिकृतज्ञता म्हणून यंदाच्या रक्षाबंधन आम्ही पोलीस ठाण्यामध्ये साजरा केला अशा भावना सिद्धी संजय घरत यांनी या वेळी व्यक्त केल्या. स्त्रिसंवाद महिला बचत गटाच्या अध्यक्ष सिद्धी संजय घरत (माजी सरपंच), सचिव जयश्रीसागवेकर, खजिनदार कावेरी डोळस, सभासद धनश्री आशिष भोईर, श्यामला शेट्टीगर सर्व सदस्या उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी भाजप खारघर-तळोजा मंडल उपाध्यक्ष संजय घरत यांचे सहकार्य लाभले.

## संपादकीय

# घोषणांची अंमलबजावणी

रक्षाबंधनच्या सणाच्या दिवशीच राज्य सरकारने आठवडाभरावर आलेल्या दहीहंडीच्या दृष्टीने मोठा निर्णय जाहीर केला. गोविंदांच्या विम्यासाठी १८ लाख ७५ हजार रूपयांची रक्कम मंजूर करण्यात आली असून ८ सप्टेंबर २०२३पर्यंत हे शासकीय विमा कवच लागू राहणार आहे. गेल्या वर्षी सत्तेवर येताच शिंदे-फडणवीस सरकारने दहीहंडी संदर्भात मोठ्या घोषणा केल्या होत्या. त्यांची अंमलबजावणी आता होताना दिसते आहे.

**राज्यात शिंदे-फडणवीस सरकार स्थापन होण्याआधीची दोन वर्षे कोरोनामुळे कुठलेच सण नीट साजरे करता आले नव्हते. दहीहंडीसारख्या सामुहिक खेळाच्या स्वरुपातल्या उत्सवावर तर पूर्णच पाणी पडले होते. निर्बंधांमुळे गोविंदा पथकांना घरातच बसणे भाग पडले होते, पण गेल्या वर्षी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दहीहंडीला साहसी खेळाचा दर्जा बहाल केल्याची घोषणा करताच गोविंदा पथकांमध्ये आगळाच उत्साह संचारला. शिंदे यांनी केलेल्या या घोषणा तोंडदेखल्या नव्हत्या याची पावती आता मिळाली असून गेल्या वर्षीच्या निर्णयांची अंमलबजावणी होताना दिसते आहे. नेहमीच सप्टेंबरआधीच दहीहंडी आणि गणेशोत्सवाची चाहूल लागलेली असते. श्रावणात येणारी दहीहंडी आणि भाद्रपदातील गणेशाच्या आगमनासाठी ढोलताशा पथकांचा सराव सुरू झालेला दिसतो. श्रावणात अधुनमधून कोसळणाऱ्या सरींमध्ये भिजतच गोविंदा पथकेही सराव करतात. प्रत्यक्षात दहीहंडीच्या दिवशीही ते आपल्याच मस्तीत भिजत, वाजतगाजत शहरभर दहीहंड्या फोडत भटकत असतात. तो अख्खा दिवस मुंबई-ठाण्यात ढाक्कुमाक्कुमचा नाद घुमत राहतो. पूर्वीच्या गिरणगावातील मराठमोळा तरुणवर्ग थोड्याफार प्रमाणात उपनगरांत वा त्याही पलीकडे ठाणे-डोंबिवलीत स्थलांतरित झाला असला तरी दहीहंडी आणि गणेशोत्सव हे सण त्याला पुन्हा आपल्या मूळच्या चाळींच्या परिसराकडे, तिथल्या मित्रमंडळींमध्ये खेचून आणतात. मराठी तरुण या दोन्ही हिंदू उत्सवांमध्ये मनापासून आनंद लुटत असले तरी गेली काही वर्षे विशिष्ट विचारसरणीच्या टोळक्याकडून या उत्सवांतील काही गोष्टींबद्दल नाके मुरडली जाताना दिसू लागली. दहीहंडीत जखमी होणाऱ्या गोविंदांच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त करण्याचे निमित्त साधून दहीहंडीवरच बंदी आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. कधी दहीहंडीच्या उंचीवर टीका, कधी लहान मुलांच्या समावेशाला आक्षेप, कधी ध्वनिप्रदूषणाच्या नावाने ओरड अशी नकारात्मक भूमिका या हिंदुत्वविरोधी टोळक्याकडून घेतली जात होती. हा अवघा टीकेचा सूर सत्तेची सूत्रे नव्याने हाती घेताच शिंदे-फडणवीस सरकारने गेल्या वर्षीच पूर्ण मोडीत काढला. कोरोना काळातील सर्व निर्बंध तर त्यांनी दूर केलेच पण दहीहंडीला साहसी खेळाचा दर्जा देऊन टीका करणाऱ्यांची तोंडेच त्यांनी बंद करून टाकली. आता तर या सरकारने गोविंदांसाठी मोठे पाऊल उचलत १८ लाख ७५ हजार रूपयांची विमा कवच योजना जाहीर केली आहे. यासंदर्भातील सर्व प्रक्रियांना मंजुरी देत शासकीय आदेश काढण्यात आले आहेत. गेल्या वर्षी ५० हजार गोविंदांना राज्य सरकारकडून शासकीय विमा कवच देण्यात आले होते. पण आता दुसऱ्याच वर्षी ही संख्या वाढवून ७५ हजार करण्यात आली आहे. गोविंदा पथकांसाठी प्रो-लीग गोविंदा स्पर्धेचे आयोजन केले जावे अशी मागणी गेली काही वर्षे होत होती. या स्पर्धेचे आयोजनही आता गुरूवारी केले गेले आहे. खेळाचा दर्जा मिळाल्यामुळे खेळाडूंना नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या पाच टक्के आरक्षणाचा लाभही गोविंदांना आता मिळणार आहे. शिंदे-फडणवीस-पवार सरकारने गेल्या वर्षी दिलेला शब्द पाळून निश्चितच मराठी तरुणांची मने जिंकली आहेत.**

# पोलादपूर पोलिसांचे भंगारचोरांवर विशेष लक्ष

महाड औद्योगिक वसाहतीमधील विविध कारखाने बंद पडले असताना त्यामधील भंगारचोरी दिवसेंदिवस वाढीस लागली असताना मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील गस्त व तपासणी कामादरम्यान पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटातील लोखंडी बिम, तसेच अन्य वजनदार लोखंडी संरक्षक कठडयांसाठीच्या बांधकाम सामुग्रीबाबत सहायक पोलीस निरिक्षक आंधळे यांच्याकडून झालेली कृती ही हा आंधळेंचा पाय आता भंगारचोरांवर पडणार असल्याची आश्वासक कृती ठरत आहे.

पोलादपूर तालुक्यातील चिरेखिंड गावातील ट्रान्सफॉर्मरमधील तांबे धातूची तब्बल ७५ हजार रूपये किंमतीची कॉईल चोरीला गेल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलीस तपासात हा मुद्देमाल किंमती असल्याची चर्चा सुरू झाली. पोलादपूर शहरातील भैरवनाथनगरमधील पाणीपुरवठयाची सिंन्टेक्स्टची साठवण टाकी तुकडे तुकडे करून भंगारामध्ये विकल्याच्या घटनेवरून राजकारण तापल्यानंतर अशाप्रकारच्या अनेक साठवण टाक्यांचे तुकडे ग्रामीण भागातील नळपाणीपुरवठा योजनांची वासलात लावून नवीन योजनांचा मार्ग खुला करण्यासाठी कार्यकर्त्यांनीच भंगारमध्ये विकल्याच्या अनेक घटना उघडकीस आल्या. पोलादपूर शहरामध्ये जुने काँक्रीटरस्ते खणून त्यामधील स्टील काढण्यासाठी तातडीने संपूर्ण मलबा चोरीला गेल्याची माहिती प्राप्त होऊनही याबाबत चर्चा झाली नाही. पोलादपूर तालुक्यात चौपदरीकरणासोबतच विविध विकास कामांची रेलचेल जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निधीतून सुरू असताना स्टील चोरीच्या घटनांमध्ये वाढझाल्याचे दिसून येत आहे. एलऍण्डटी सारख्या कंपन्यांदेखील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणात स्टीलचे शिल्लक राहिलेले तुकडे चोरून नेण्यासाठी भंगारमाफियांशी संगनमत करीत असल्याचे जाणवले आहे.

## लोखंडी सामान गायब होण्याचा सर्रास प्रकार

पोलादपूर तालुक्यातील रस्त्यालगतचे क्रॅश बॅरियर्स तसेच अन्य लोखंडी सामान गायब होण्याचा सर्रास प्रकार सुरू आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या रस्त्यालगतचे खांब काढून बाजूला ठेवून नवीन रस्त्यालगत विजेचे पर्यायी खांब उभारण्यात आले असताना त्या खांबांची वेळीच दिवील रस्त्यावरील तुर्भे सबस्टेशनच्या आवारात वाहतूक न झाल्याने चोरीला जाण्याचा प्रकार वाढला आहे. समुद्रातून लोटाभर पाणी कमी झाल्याने काही फरक पडत नाही या न्यायाने गेल्या काही महिन्यांपासून ट्रक्स, कंन्टेनर्समधून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून वाहतूक होणाऱ्या स्टीलमधून काही स्टील परस्पर संगनमताने काढून बाजूला साठविणे, रस्त्यालगतचे जुने विजेचे खांब काही अंतरावर ठेऊन कालांतराने ते ट्रकबाहेर दिसणार नाहीत इतपत लांबीने कापून त्यांची वाहतूक करणे, दरीलगतचे क्रॅश बॅरियर्स दरीत ढकलून कालांतराने त्याची परस्पर वाहतूक करून विक्री करणे अथवा त्याच क्रॅश बॅरियर्सना चंदेरी रंग लावून ठेकेदाराला नवीन क्रॅश बॅरियर म्हणून विकणे आदी कामांमध्ये स्टील गायब करण्यामध्ये सक्रीय असलेल्या व्यावसायिकांना संबधित खात्यातील काही लोकांचेही छुपे सहकार्य मिळत आहे.

लोहारमाळ येथे रस्त्यालगत पडलेला वीजेचा जुना लोखंडी खांब ट्रकमधून बाहेर दिसणार नाही एवढाच कापून ठेवताना एक व्यक्ती दिसून आल्याचा एक व्हिडीओ महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सूद यांना एका ग्रामस्थाने मोबाईलद्वारे पाठविल्यानंतर यासंदर्भात केवळ संबंधित कंपनीच्या प्रोजेक्ट मॅनेजरला तंबी देणारं पत्र पोलादपूर उपविभागाकडून पाठविण्यात आले असले तरी हा प्रकार महाड-पोलादपूर दरम्यान सातत्याने सुरू असलेल्या जुने-नवे स्टील चोरीच्या घटनांपैकी असल्याची चर्चा सुरू आहे.

दरम्यान, याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरूध्द फक्त एनसी गुन्हा दाखल दाखल झाला. पोलादपूर शहरातील पार्टे कोंड ते सावंतकोंड दरम्यानचा एक लोखंडी पूल चोरीला गेल्याची तक्रार नगरपंचायत पोलादपूरकडून पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्यानंतर शनिवारी रात्रीच्या अंधारात काही अज्ञात व्यक्तींनी याच पुलाच्या ठिकाणी या पुलाचे अवशेष आणून टाकले आहेत. रविवारी ही बातमी पोलादपूर शहरात सर्वत्र पसरल्यानंतर हा विजय विरोधी नगरसेवकांचा की पोलादपूर पोलीसांच्या मध्यस्थीचा अशी चर्चा जोर धरू लागली.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

आरोपीला अटक करण्याऐवजी मुद्देमाल छिन्नविछिन्न स्वरूपात घटनास्थळी पुन्हा हजर झाल्याने सर्वशृत अज्ञात आरोपीविरोधात कायदेशीर कारवाई होण्याऐवजी त्याचा बचाव करण्यासाठी झालेल्या प्रयत्नांची सर्वत्र चर्चा सुरू हेऊन मावळली. पोलादपूर तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी राष्ट्रीय महामार्गाच्या कामातील बांधकाम साहित्याची चोरी होत असल्याचा दिवसेंदिवस पोटठेकेदार असलेल्या एसडीपीएल कंपनीला संशय आला असताना पोलादपूर पोलीस ठाण्यास दिलेल्या तक्रारीनुसार गुप्तवार्ता विभागाने काढलेल्या माहितीवरून गुरांच्या गोठयामध्ये चोरून आणलेले स्टील अज्ञात आरोपीने लपवून ठेवल्याचे आढळून आले.

पोलादपूर शहरातील सैनिकनगर येथे सध्या वास्तव्यास असलेल्या प्रदीप तुकाराम चव्हाण (वय ३६, जळगांवरोड, ता.जि.औरंगाबाद) यांनी कशेडी घाटाला पर्यायी भुयारी राष्ट्रीय महामार्गाच्या कामातून बांधकामाच्या साहित्याची सातत्याने चोरी होत असल्याची तक्रार पोलादपूर पोलीस ठाण्याला दिली होती. यामध्ये २५ मी.मी. जाडीचे बांधकामाच्या जुन्या वापरत्या स्टीलचे तुकडे अंदाजे २५० कि.ग्रॅ. वजनाचे किंमत अंदाजे १५ हजार रूपये आणि ३२ मी.मी. जाडीचे जुन्या वापरत्या स्टीलचे अंदाजे ३५० कि.ग्रॅ. वजनाचे तुकडे यामुळे हे बांधकाम साहित्य हस्तगत करण्याचे आव्हान पोलादपूर पोलीसांसमोर होते. यावेळी गुप्तवार्ता विभागाने या बांधकाम साहित्याच्या चोरीवर बारकाईने लक्ष ठेवले असता भुयारी महामार्गाचे काम सुरू असलेल्या भोगाव गावाच्या हद्दीत ४ मार्च रोजी सायंकाळी सात वाजल्यापासून ५ मार्च रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत एका गोठयामध्ये अंदाजे ३६ हजार रूपये किंमतीचे हा बांधकाम साहित्यातील जुने वापरते स्टिल हस्तगत केले. याप्रकरणात चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याची धमकी देत अनेक ग्रामस्थांची लूटमार झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

महाड औद्योगिक पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक आंधळे यांनी पकडलेल्या मुद्देमालाच्या चोरीचा गुन्हा पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल झाला होता. मात्र, या गुन्ह्याची पोलादपूर पोलीसांकडून खबर कोणालाही देण्यात आली नव्हती. याप्रकरणी तरूण राजकुमार यादव (४१, रा. सह्याद्रीनगर पोलादपूर) याने पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये २६ ऑगस्टरोजी दिलेल्या फिर्यादीमध्ये अज्ञात चोरटयांनी दि.२८ जून ते २६ ऑगस्ट २०२३ या कालावधीमध्ये २ लाख १० हजार रूपये किंमतीचे इंग्रजी सी आकाराचे ६९ नग, २९ हजार रूपये किंमतीचे इंग्रजी सी आकाराचे ५ नग, १८ हजार ९०० रूपये किंमतीचे इंग्रजी सी आकाराचे ७ नग, ४५ हजार रूपये किंमतीचे ३०० नटबोल्ट, ५ लाख रूपये किंमतीचे अडीच मीटर लांबीचे १०० मेटल बीम असा एकूण ८ लाख २ हजार ९०० रूपये किंमतीचे लोखंडी संरक्षक कठडे उभारण्याचे सामान चोरून नेल्याचे नमूद केले होते. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक उपनिरिक्षक धुमास्कर हे सहायक पोलीस निरिक्षक म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करीत होते. महाड औद्योगिक वसाहतीच्या पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक मारूती आंधळे आणि सहकारी शनिवारी रात्री मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची झडती घेत असताना अचानक पोलादपूरहून येणाऱ्या महिंद्रा कंपनीच्या झायलो गाडीचा संशय आल्याने या गाडीची झाडाझडती घेतली असता गाडीमध्ये गाडीत चोरून आणलेले स्टिलचे व लोखंडी ऍंगल व गाडीसह १५लाख ३ हजार ३०० रूपयांचा ऐवज दिसून आला. चोरून आणलेल्या मुद्देमालासह महिंद्रा कंपनीची झायलो कार (क्र.एम एच ०६ ए डब्ल्यू ६०६८) महाड एमआयडीसी पोलिसांनी जप्त केली असून तीन आरोपींनादेखील गजाआड केले आहे.

या तीन आरोपींपैकी आरोपी शुभम अनंत घाडगे व प्रतीक हरीश घाडगे हे दोघे महाड तालुक्यातील चांभारखिंड येथील रहिवासी असून तिसरा आरोपी अल्पवयीन विधीसंरक्षित आहे. पोलीसांनी मनाशी ठरविले तर चोरीचकारीचे धंदे सहज बंद होऊ शकतील. मात्र, राजकारण्यांच्या भंगारनेतृत्वामुळेच या भुमिकेपर्यंत पोलीस पोहाचत नाहीत हे दुर्दैव आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### आता ट्विटरवर मिळणार नोकऱ्या; आले नवीन फीचर



इलॉन मस्क यांनी मायक्रो ब्लॉगिंग साईट एक्स (पूर्वी ट्विटर) खरेदी केल्यानंतर यात सातत्याने बदल करीत आहेत. अलीकडेच त्यांनी एक्सवर कमाईची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यानंतर आता कंपनीने एक विशेष कार्यक्रम सुरू केला आहे. इलॉन मस्क त्यांच्या मालकीच्या प्लॅटफॉर्मवर नोकऱ्या उपलब्ध करुन देणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीने द हायरिंग बीटाची घोषणा केली आहे. याला व्हेरिफाइड ऑर्गनायझेशन्ससाठी तयार करण्यात आले आहे. याद्वारे कंपन्या ट्विटरवर नोकऱ्यांच्या जाहिराती/माहिती टाकू शकतील. व्हेरिफाइड कंपन्या किंवा संस्था त्या आहेत, ज्यांनी ट्विटरच्या 'व्हेरिफाइड ऑर्गनायझेशन्स'चे सबक्रिप्शन घेतले असेल. याच कंपन्या द हायरिंग बीटा प्रोग्रामसाठी साइनअप करू शकतात.

XHiring हँडलने ट्विटरवर या कार्यक्रमाबद्दल पोस्ट केले आहे. एक्स हायरिंग म्हणाले की, एक्स हायरिंग बीटा वापरण्यासाठी अनलॉक करा हे व्हेरिफाइड ऑर्गनायझेशन्ससाठी आहे. याच्या मदतीने कंपन्या लाखो लोकांपर्यंत पोहचू शकतील. एकूणच काय तर ट्विटरने कंपन्यांना व्हॅकन्ट जागेवर भरती करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. ट्विटर युजर्सदेखील या नोकऱ्यांसाठी अर्ज करू शकतील.

**'लिंक्डइन'शी स्पर्धा**

रिपोर्ट्सनुसार कंपन्या त्यांच्या प्रोफाइलवर जास्तीत जास्त ५ नोकऱ्या जोडू शकतात. इलॉन मस्क यांनी हे पाऊल डळपज्ञशवखप सारख्या लोकप्रिय जॉब पोस्टिंग प्लॅटफॉर्मशी स्पर्धा करण्यासाठी उचलले आहे. आता हा नवीन प्लॅटफॉर्म किती लोकप्रिय ठरतो, हे येणाऱ्या काळात कळेल.

एकंदर काय तर सोशल नेटवर्किंग साईट्समध्येही तीव्र स्पर्धा दिसून येत आहे. आपली साईट जास्तीत जास्त लोकप्रिय व्हावी यासाठी सर्वच कंपन्यांचे मालक प्रयोग करू लागले असून नागरिकांना विविध मार्गांनी आपल्याकडे आकर्षित करीत असल्याचे दिसून येत आहे. यातून नागरिकांना काही फायदेही मिळत आहेत.

# शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक



**निमित्त**

ताराबाईंनी गिजुभाईंच्या मृत्यूनंतर पुढील १२ वर्षे नूतन बालशिक्षण संघाची धुरा वाहिली. ग्रामीण भागात बालशिक्षणाचा प्रसार करणे हे या संघाचे काम होते. खेड्यांमध्ये शास्त्रीय पद्धतीने मात्र कमी खर्चात बालवाड्या चालविण्यासाठी १९४५ मध्ये ताराबाईंनी ठाणे जिल्ह्यातील बोर्डी येथे ग्राम बालशिक्षा केंद्र स्थापिले. आज ताराबाई मोडक यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयीचा लेख...

ताराबाई मोडक या प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक. ताराबाई या चाकण (जि. पुणे) येथील केळकर घराण्यातील. त्यांचा जन्म १९ एप्रिल १८९२ रोजी मुंबई येथे झाला. वडिलांचे नाव सदाशिवराव व आईचे उमाबाई. वडील सुबोध पत्रिका या साप्ताहिकाच्या संपादनाबरोबरच हितोपदेश, कामगार ही साप्ताहिक आणि ज्ञानदीप हे मासिक चालवत असत. आईही स्त्री शिक्षण, विधवा विवाहासाठी काम करत असे. बुद्धिमान व सुधारणावादी आईवडिलांमुळे ताराबाईंकडे बुद्धिमत्तेचा वारसा आला. १९१४ मध्ये ताराबाई मुंबई विद्यापीठातून बी. ए. झाल्या. त्यांनी कृष्णा वामनराव मोडक यांच्याशी १९१५ मध्ये नोंदणी पद्धतीने प्रेमविवाह केला. त्याला दोन्ही घरच्या लोकांचा विरोध होता.

ताराबाईंनी १९२२ मध्ये राजकोट येथे बार्टन फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये लेडी सुपरिटेंडन्ट म्हणून रुजू झाल्या. या पदावर काम करणार्या त्या पहिल्या भारतीय महिला होत. त्यानंतर त्यांनी गिजुभाई बधेका यांच्या साह्याने भावनगर येथे मॉंटेसरीच्या तत्त्वांवर आधारलेली 'गीता शिक्षण पद्धती' निश्चित केली. हाच ताराबाईंच्या बालशिक्षण कार्याचा प्रारंभ होय. शिक्षणाचा खरा पाया मुलांच्या बालवयातच घातला जाण्याची शक्यता व आवश्यकता असते, या दृष्टीने त्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षणाचे नवीन पाऊल टाकले. १९२३-१९३२ ही नऊ वर्षे त्यांनी भावनगरच्याच दक्षिणामूर्ती शिक्षणसंस्थेत प्राध्यापिका म्हणून काम केले. १९३३ पासून त्यांनी शिक्षणाबाबतची शिक्षणपत्रिका काढायला सुरुवात केली. १९३६ साली त्यांनी नूतन बालशिक्षण संघाची स्थापना केली. पुढे बालशिक्षणाचे हे लोण महाराष्ट्रात पसरले.

ताराबाईंनी गिजुभाईंच्या मृत्यूनंतर पुढील १२ वर्षे नूतन बालशिक्षण संघाची धुरा वाहिली. ग्रामीण भागात बालशिक्षणाचा प्रसार करणे हे या संघाचे काम होते. खेड्यांमध्ये शास्त्रीय पद्धतीने मात्र कमी खर्चात बालवाड्या चालविण्यासाठी १९४५ मध्ये ताराबाईंनी ठाणे जिल्ह्यातील बोर्डी येथे ग्राम बालशिक्षा केंद्र स्थापिले. या संस्थेतूनच ग्रामीण बालवाडी व ग्राम बाल अध्यापन मंदिर या संस्था निघाल्या. या संस्थांचा लाभ आदिवासी मुलांना मिळावा, म्हणून त्यांच्या आदिवासी परिसरात आणि अंगणात बालवाडी चालविण्याचा उपक्रम करण्यात आला. प्राथमिक शाळेत मुलांची अनुपस्थिती हा गंभीर प्रश्न होता. मुले शाळेत हजर राहावीत म्हणून ताराबाईंनी गृहभेटी, प्रचार फेर्या, दिंडी, मुलांसाठी बैलगाडीची सोय, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविले. अशा या महान शिक्षणतज्ज्ञाचे ३१ ऑगस्ट १९७३ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**


**क्लिक...क्लिक...!**



**विटा : समोरुन येणारा तो मेंढराचा कळप पाहून मला फोटो काढायचा मोह आवरला नाही, पटकन फोटो काढून कळपाबरोबरच्या त्या शेतकऱ्यास विचारले, कुठून आलाय पाव्हणं, त्यावर तो म्हणाला सोलापूरासनं आलूया अन् वरच्या भागात चाललुया, मेंढराबरोबर त्यांचीही पावले पुढे पुढे सरकत असताना, जास्त न बोलता मी म्हणलो चला येतो, त्यावर तो हात वर करत म्हणाला, गेली सांगून ज्ञानेश्वरी अन् माणसांपरास मेंढरं बरी...** (छाया : शशिकांत बारसिंग)

## आरोग्य प्रहर

### मान, खांदे, मणका, पाठदुखी हे आसन करून पळवा वेदना



एक काळ असा होता की, लोकांना सर्व्हिकल स्पॉन्डिलायटिससारख्या समस्येचे नावदेखील माहीत नव्हते; पण आजकाल ही समस्या खूप सामान्य झाली आहे. गेल्या काही वर्षांत तरुणांमध्ये ही समस्या वाढली आहे. इतकेच नाही, तर कधी कधी सर्व्हिकल स्पॉन्डिलायटिसची समस्या किशोरवयीन आणि लहान मुलांमध्येही दिसून येते. मोबाईल आणि लॅपटॉपमध्ये घालवलेले तास, चुकीच्या मार्गाने बसणे, चुकीच्या पद्धतीने झोपणे, व्यायाम न करण्याची सवय, तणाव इ. याची प्रमुख कारणे आहेत. याबाबत योगतज्ज्ञ कामिनी बोबडे यांनी सविस्तर माहिती दिली.

सर्व्हिकल स्पॉन्डिलायटिसवर कोणतेही अचूक उपचार नाहीत, कारण हा जीवनशैलीचा आजार आहे, परंतु जीवनशैलीत बदल करून आणि काही योगासनांच्या मदतीने हा आजार नियंत्रित केला जाऊ शकतो. धनुरासनामुळे सर्व्हिकल स्पॉन्डिलायटिसवर थोडा आराम मिळू शकतो. या आसनामुळे मानेच्या वरच्या भागाला आराम मिळतो. धनुरासन, सर्पासन, द्विकोनासन इत्यादी सोप्या पद्धतींद्वारे या त्रासापासून आपण सुटका मिळवू शकतो.

धनुरासनामुळे पाठीचा कणा आणि हाडे मजबूत होतात. धनुरासन केल्याने भूक वाढते. धनुरासनाचे फायदे बघता ते सर्वांसाठीच योग्य आहे, पण ज्यांना कंबरदुखी, पाठदुखी, अर्धशिशी, डोकेदुखी, उच्च किंवा कमी रक्तदाबाचा त्रास आहे त्यांनी हे आसन करणे टाळावे तसेच गरोदर महिलांनी हे आसन करू नये, असा सल्ला तज्ज्ञ देतात.

**धनुरासन कसे करावे**

हे आसन करण्यासाठी पोटावर झोपावे. हात बाजूला ठेवून पाय सरळ ठेवावेत. नंतर आपले गुडघे मागे वाकून, आपले पाय नितंबांच्या जवळ आणा. मग हळुवारपणे आपले घोटे हातांनी धरा. लक्षात ठेवा की, हे आसन करताना तुमचे नितंब आणि गुडघे एकाच जागी असावेत. तुम्ही तुमचे पाय तुमच्या धडाच्या जवळ आणता, तेव्हा तुमच्या मांड्या जमिनीपासून किंचित वर करा. लक्षात ठेवा की, तुमचे डोके आणि छाती दोन्ही अवयव एकाच वेळी उंचावले पाहिजेत. चार-पाच श्वासांसाठी थांबा. जर तुम्हाला श्वास घेण्यास त्रास होत असेल, तर हलके स्ट्रेच केल्याने आराम मिळू शकतो. जर तुम्हाला जास्त त्रास होत असेल, तर तुम्ही हे आसन सोडू शकता.

निवडक



## कोतवाल खुर्द येथे शेतकरी दिन

**पोलादपूर :** पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील जन्म दिवस नारळी पौर्णिमेच्या दिवशी राज्यात शेतकरी दिन साजरा केला जातो. कोतवाल खुर्द येथे पोलादपूर तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांचे मार्गदर्शनाखाली शेतकऱ्याच्या शेतात शेतकरी दिन साजरा करण्यात आला. कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कोतवाल खुर्द येथे सरपंच अविनाश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नामदेव तुकाराम शिंदे यांचे आंबा फळबागेत शेतकरी दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी उपसरपंच बबन शिंदे, नामदेव चव्हाण, सहदेव शिंदे, नारायण चव्हाण, विश्वनाथ शिंदे, कोंडीराम शिंदे, संतोष सकपाळ, नामदेव शिंदे, सतिश शिंदे, संगिता शिंदे, कृषी सहाय्यक मनोज जाधव आदी उपस्थित होते.

## माणगाव तालुक्यात रक्षाबंधन उत्साहात

माणगाव : बहिण भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या



रक्षाबंधनाचा उत्सव माणगाव तालुक्यात दि. ३० ऑगस्ट २०२३ रोजी अत्यंत उत्साहात साजरा झाला. रक्षाबंधन सण ग्रामीण व शहरी भागात पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या निमित्ताने रक्षाबंधनाच्या पूर्व संध्येला बाजारपेठेतून राखी खरेदीसाठी महिलांची विशेष गर्दी दिसून येत होती. ऐन सणाच्या हंगामात पावसाने विश्रांती घेतल्याने लहानगे, बच्चे कंपनी, प्रौढ मंडळींनी अत्यंत उत्साहात रक्षाबंधन सण साजरा केला. यानिमित्ताने बाजारपेठेतही खरेदीचा विशेष आनंद दिसून आला. खरेदीच्या उत्साहामुळे ग्राहक, व्यापारी आनंदी होते.

## सदाशिव रहातेकर यांचा सत्कार

कर्जत : आजादी का अमृत महोत्सव समारोपीय वर्ष मेरी मिटटी मेरा देश या कार्यक्रमांतर्गत कर्जत नगर परिषदेच्यावतीने पंडीत सदाशिव त्र्यंबक रहातेकर यांना सन्मान पत्र देवुन त्यांचा सत्कार करण्यात आला, वृध्द असल्याने नगरपरिषदेचे त्यांच्या निवासस्थानी जावून त्यांचा सत्कार केला. राहतेकर यांच्या निवासस्थानी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगरसेवक बळवंत घुमरे, अभियंत्या सारिका कुंभार, कल्याणी लोखंडे, रवींद्र लाड, अविनाश पवार, बापू बेहरम, हरिश्चंद्र वाघमारे यांनी त्यांना शाल, श्रीफळ सन्मान पत्र देवून त्यांचा सत्कार केला. कर्जत येथील संस्कृत भाषेत वृत्तबद्ध काव्ये रचणारे कवी व लेखक पं. सदाशिव त्र्यंबक रहातेकर, वय ९० वर्षे, यांचा कर्जत नगरपरिषदेने त्यांच्या संस्कृत भाषेतील शैक्षणिक योगदानाबद्दल नुकताच सत्कार केला.



# महाडमध्ये जुगार अड्ड्यावर छापा; तिघांवर गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील विविध भागात गेली दोन वर्षापासून अवैध जुगार अड्डे बोकाळले आहेत. यातील सुकटगल्ली भागात जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून केलेल्या कारवाईत रोख रकमेसह तीन आरोपींना ताब्यात घेतले. गेली कांही दिवसांपासून जुगार अड्ड्यावर कारवाई व्हावी अशी मागणी केली जात होती.

महाड शहरात मटका, जुगार, ऑनलाइन लॉटरी व इतर बेकायदेशीर धंदे राजरोसपणे सुरू आहेत. याबद्दल नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे काही दिवसांपूर्वीच हे धंदे तत्काळ बंद करण्यासाठी पोलिसांना निवेदन देण्यात आले होते. यामुळे महाड शहरातील बेकायदेशीर धंदेवाल्यांना सध्या चांगलाच चाप बसला होता परंतु आजही हे अवैध धंदे राजरोसपणे सुरू आहेत. यातील सुकट गल्ली भागात चोरीछुपे मटका अड्डे सुरू असल्याची तक्रार पोलिसांना प्राप्त झाली आणि त्यानुसार मंगळवार दिनांक २९ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारच्या सुमारास शहरातील सुकटगल्ली भागात बेकायदेशीर सुरू असलेल्या सोरट पद्धतीच्या या जुगार अड्ड्यावर शहर पोलिसांनी कारवाई केली.

यामध्ये रोख रक्कमेसह जुगाराचे साहित्य जप्त करून पोलिसांनी मनोज महादेव दाखिनकर, निलेश विलास शिंदे व सुनील संतोष चव्हाण या तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र जुगार अधिनियम १८८७ च्या कलम१२अ नुसार कारवाई केली आहे. महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा अधिक तपास सुरू आहे.

# माणगावात रिक्षा संघटनेतर्फे नारळी पौर्णिमा उत्साहात साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका रिक्षा चालक-मालक संघटनेतर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नारळी पौर्णिमा बुधवारी (दि. ३०) उत्साहात साजरी करण्यात आली. सुरुवातीला माणगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी नितीनकुमार पोंदकुळे यांच्या हस्ते नारळाची पूजा करण्यात आली.



या वेळी संघटनेचे संस्थापक तथा तालुकाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संजयआण्णा साबळे, पोलीस कॉ. नाथा दहिफळे, रिक्षा चालक-मालक संघटना एसटी स्टँड माणगाव विभागीय अध्यक्ष संतोष सावंत, उपाध्यक्ष जमाल पिलपिले, लियाकतभाई रहाटविलकर, विशेष सल्लागार हुसेनभाई आकुस, नरेश सावंत, पांडुरंग गुजर, सेक्रेटरी निलेश आडीत, खजिनदार नंदू खरे, विलास वेदक आदींसह रिक्षा चालक-मालक संघटनेचे सर्व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माणगाव तालुका रिक्षा संघटनेतर्फे गेली अनेकवर्षे नारळी पौर्णिमेचा सण उत्साहात साजरा केला जात आहे. माणगाव तालुक्यातील रिक्षा चालक-मालक यांनी रिक्षा संघटनेचे संस्थापक तथा तालुकाध्यक्ष संजयआण्णा साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा नारळी पौर्णिमा सण उत्साहात साजरा केला. या वेळी संघटनेतर्फे गाडी सजवून नारळाची वाजत, गाजत, लेझीमच्या तालावर नाचत माणगाव बस स्थानक येथून मुंबई-गोवा महामार्गाने बाजारपेठ ते काळनदी अशी उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी माणगाव काळ नदीच्या पात्रात नारळाचे उत्साहात विसर्जन करण्यात आले.

# रेल्वेरुळावर आढळला तरुणीचा मृतदेह

**माणगाव : प्रतिनिधी**

रक्षाबंधनाच्या दिवशी रेल्वे रुळावर अनोळखी तरुणीचा मृतदेह मिळाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे माणगाव तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचले.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, आडघर गावच्या हद्दीत मंगळवारी (दि. ३०) रेल्वे रुळावर स्टोन क्र. ३५/२३-३५/२४ च्या दरम्यान दुपारी १.४५ वा. ते २.१५ वा. च्या सुमारास उपट्रॅक वर नेत्रावती एक्सप्रेस गाडी क्र. १६३४६ ची धडक लागून तरुणीचा मृत्य झाला. या घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावर सुरुवातीलाच तरुणीचे बूट आढळून आले. थोड्या अंतरावर अंदाजे वय २५ वर्ष पूर्ण चेहरा विद्रुप झालेला व



रेल्वेच्या धडकेने रेल्वे रुळावर पडलेला तरुणीचा मृतदेह आढळून आला. तसेच पोलिसांनी आजूबाजूला शोध घेतला असता पूर्णतः मोबाईल आढळून आला. नेमका हा प्रकार अपघात आहे की आत्महत्या याचा पुढील तपास माणगांव पोलीस करीत आहेत. मयत तरुणीचे नाव अजिता संदीप दसवते (वय २२, रा. गारळ, माणगाव) असे आहे.

# भाजपतर्फे रक्षाबंधन कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चा यांच्या वतीने खालापूर पोलीस ठाण्यात, चौक पोलीस दूर क्षेत्र व इरसाल वाडीच्या पुनर्वसन कंटेनर हाऊस येथे पवित्र रक्षाबंधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



खालापूर पंचायत समितीच्या माजी उपसभापती वत्सला मोरे, भाजपा तालुका अध्यक्ष सुजाता दळवी, खालापूर तालुका चिटणीस निकिता हेलंदे, यशोदा मोरे ग्रामपंचायत सदस्य वडवल, पुष्पा गवळी यांच्या सह अनेक महिला यांनी पोलीस व इरसाल वाडीचे पुरूष यांना राखी बांधून प्रेमाचं घट्ट नात विनाल. या वेळी अनेक महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# एक राखी माझ्या सैनिकाला! | जिल्हा परिषद शाळा मजगांवचा उपक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा मजगांवच्या विद्यार्थीनींनी स्वतः राख्या बनवून एक राखी माझ्या सैनिकाला हा उपक्रम हाती घेतला. इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थीनींनी कार्यानुभव विषयाचे प्रात्यक्षिक म्हणून स्वतः राख्या बनवल्या. या स्वनिर्मित राख्या भारत देशाच्या सैनिकांना पाठवून दिल्या.

या उपक्रमासाठी शाळेचे वर्गशिक्षका मनिषा भोईर, प्रमिला फुंदे, रंजिता केमकर, श्रृती आयरकर, चेतन चव्हाण,



सिद्धेश फेंगडू व हेमकांत गोयजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सैनिकांप्रती आदर व्यक्त करणाऱ्या उपक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखील मानाजी, उपाध्यक्ष उमेश कोंडाजी, युवा नेते अमित कोळी, योगेद्र गोयजी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# दिव्यांग विद्यार्थिनींनी बांधल्या पोलीसदादांना राख्या

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली पोलीस ठाण्यात शालोम एज्युकेशन सेंटर संचालित सोफीया दिव्यांग शाळेच्या विद्यार्थिनींनी पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना राख्या बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.

शाळेच्या मुख्याध्यापिका शुभा पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग विद्यार्थिनीनीसाठी छोटासा

(छाया : जयवंत माडपे)



कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शितलकुमार राऊत, सहाय्यक निरीक्षक प्रवीण स्वामी, उपनिरीक्षक अभिजित व्हराबळे, अलोक खिसमतराव, सुधाकर लहाणे, कर्मराज गावडे, सहाय्यक फौजदार सागर शेवते, सचिन घरत, प्रसाद पाटील, किरण शिर्के, तडवी, वसंत जाधव, भारती नाईक, स्नेहल घरत, प्रांजली पाटील, तसेच शाळेच्या शिक्षिका साक्षी पवार, मंजू बोडके, जयकुमार म्हात्रे, रुचिता सावंत, दुर्गा दबडे उपस्थित होत्या.


## अलिबाग नगरपरिषद

**पाणीपुरवठा विभाग**

**फेर ई-निविदा सुचना सन २०२३-२४**

अलिबाग नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडील फेर ई-निविदा सुचनेमध्ये अलिबाग शहराच्या पाणीपुरवठा विभागातील संप हाऊस वरील पंप दुरूस्ती देखभाल करणेबाबत ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सुचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ३१/०८/२०२३ रोजी पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करणेंत येईल.

अनप/पा.पू./
निविदा-२/जा.क्र.२२६५

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद**


# भाजप महिलांचे इर्शाळवाडीत रक्षाबंधन



**खोपोली : प्रतिनिधी**

इर्शाळवाडी कुटुंबाची दुःखाची जखम अद्याप ताजी असून खालापूर महिला महिला भाजप आघाडीतर्फे रक्षाबंधन साजरे करत नवीन नाती जोडून वेदना कमी करण्याचे छोटासा प्रयत्न करण्यात आला.

नवीन जागेत कंटेनर वसाहतीत राहत असलेल्या वाडी कुटुंबांना सध्या मानसिक आजाराची गरज या कुटुंबांना असून खालापूर महिला भाजप आघाडीच्यावत्सला मोरे, भाजपा तालुका अध्यक्ष सुजाता दळवी निकिता हेलंदे, यशोदा मोरे, पुष्पा गवळी यांनी इर्शाळवाडी तात्पुरती वसाहतीत भेट देत रक्षाबंधन साजरे केले.

> **वेदना न संपणाऱ्या आहेत. पैसा, मदत यांनी भरपाई होवू शकत नाही. आता आठवणीत जगायच आहे.**
> **-यशवंत दोरे, ईर्शाळवाडी ग्रामस्थ**

इर्शाळवाडीतील अनेक कुटुंबात कर्ता भाऊ तर घराला हातभार लावणारी बहीण गमावली आहे. पारधी, दोरे या कुटुंबाला मायेचा ओलावा देण्यासाठी भाजपा महिला आघाडीने साजरा केलेला रक्षाबंधन सण उपस्थित शासकीय अधिकाऱ्यांच्या मनात देखील मायेचा ओलावा निर्माण करणारा ठरला. यावेळी अनेकांचे डोळे पाणावले होते.

# पडम कोळीवाड्यात नारळी पौर्णिमा उत्साहात



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कोळी समाजाचे असलेले गाव पडम येथे नेहमीच सर्व उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात. बुधवारी (दि. ३०) नारळी पौर्णिमेचा उत्सव ही ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. गावातील सर्व ग्रामस्थ महिला मंडळ मिरवणुकीत सामील झाले होते.

सायंकाळी गावातील ग्रामस्थांनी आरती करीत नारळ हातगाडीवर ठेवत उत्सवप्रिय असलेल्या पडम कोळीवाडयात नारळी पौर्णिमा निमित्ताने भव्य मिरवणुक काढली होती. सायंकाळी ५.१५ च्या सुमारास नारळ कुंडलिकेला अर्पण करण्यासाठी पडम कोळीवाडयातील ग्रामस्थ निघाले.


## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, मौजे-कुडावे ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकत १. सुधीर सदाशिव कांडपिळे २. रेखा सदाशिव कांडपिळे यांचे सामायीक मालकीचे व ताबे कब्जा वहीवाटीत असुन सदरची मिळकत आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे बोलणी करुन निश्चित ठरले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| स.नं./ हिस्सा नं. | क्षेत्र, हे. आर. पॉ. | पोटखराबा क्षेत्र हे. आर. पॉ. | एकुण क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पैस |
|---|---|---|---|---|
| ४३/६ | ०-०५-१० | ०-००-२० | ०-०५-३० | ००-६९ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणीही व्यक्ती अथवा संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, फरोक्तखत/खरेदीखत, खरेदी, साठेकरार, विकसन करार, कुलहक्क, ताबाहक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा, इजमेंट, लिज, लीन अथवा अन्य कोणताही प्रकारचा कायदेशीर हक्क-हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, अशा हरकतींमध्ये नमुद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नमुद केलेल्या पत्त्यावर किंवा प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिलांबरोबर सदर मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर व जमिनमालकांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

सही/-
**ॲड. विकास जानू भगत**
रुम नं. १, ए विंग, तळमजला,
यशोदर्शन सोसायटी, विरुपाक्ष मंदिरासमोर,
व्हाईट कॉलर दुकानाच्या मागे, शिवाजी रोड,
ता. पनवेल जि. रागयड ४१० २०६.

ठिकाण :- पनवेल
तारीख :- ३१.०८.२०२३


# एक धागा मायेचा! पोलिसांसोबत रक्षाबंधन सण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका अजित पवार समर्थक राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांनी नेरळ येथील पोलीस ठाण्यातील पोलीस बांधवांना राखी बांधल्या.

या वेळी कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला अध्यक्षा ॲड. रंजना धुळे, युवती काँग्रेसच्या अध्यक्षा सुचिता लोहकरे,



आदिवासी सेलच्या अध्यक्षा अंजूताई चौधरी, रायगड जिल्हा सदस्या सीमा गरुड, कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा मनीषा पाटील, नेरळ ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्या रेणुका चंचे, नेरळ शहर महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा अंकिता मोरे, सरचिटणीस संगीता सरवदे, पिंपळोली पंचायत समिती वॉर्डच्या अध्यक्षा मीनल धुळे आदी उपस्थित होत्या. या वेळी नेरळ पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर आणि त्यांचे सहकारी कर्मचारी उपस्थित होते.



**रोहा : सकाळी शहरासह परिसरात धुक्याची चादर पसरली होती. भुवनेश्वर येथील छायाचित्र टिपले आहे महादेव सरसंबे यांनी.**


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**PUBLIC NOTICE**

The following Power consumers under 100kV Taloja Substation in EHV (O&M) Dn., Panvel are informed that, the power supply of the following power lines will be shut down on **Friday Dt. 01.09.2023** for maintenance and repair work for the time indicated below. Please co-operate.

| Sr. No. | Substation | Feeder No. | Date & Time | Areas |
|---|---|---|---|---|
| 1 | 100/22kV TALOJA | 22kV MIDC-1 | On 01.09.2023 From 09:00 Hrs to 17:00 Hrs | Chemical Zone |
| 2 | | NEW KALAMBOLI | | Kalamboli City |
| 3 | | 22kV MIDC-5 | | Engineering Zone |
| 4 | | 22kV MIDC-4 | | New Chemical Zone |
| 5 | | 22kV APCOTEX | | Apcotex Company |
| 6 | | 22kV BEL-1 | | M Plot |
| 7 | | 22kV MIDC-2 | | New Chemical Zone |
| 8 | | 22kV WAWANJA | | Kanpoli Pale Budruk Valap Village |
| 9 | | 22kV NAVADA SWITCHING | | Devicha Pada Chindaran, Ghot Nithalaj Wawanja Village |
| 10 | | 22kV NEW PANCHNAND | | TALOJA PH-2 |

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

# नारळी पौर्णिमेनिमित्त उत्साहाला उधाण



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

'सण आयलाय गो आयलाय गो नारळी पुनवेचा' अशी गाणी म्हणत ढोल ताशा व बेंजो च्या तालावर थिरकत नवी मुंबईतील आगरी कोळी ग्रामस्थांनी दर्या राजाला नारळ अर्पण करत नारळीपोर्णिमेचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. हा सण साजरा करताना आगरी कोळ्यांच्या उत्साहाला अक्षरशः उधाण आले होते.

वर्षभर आपला उदर निर्वाह करणाऱ्या व आपला सांभाळ करणाऱ्या दर्या राजाला नारळ अर्पण पूजा करून नारळी पौर्णिमेचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नवी मुंबई शहर हे खाडी किनारी वसले आहे. त्यामुळे येथील स्थानिकांचा शेती आणि पारंपा रीक व्यवसाय आहे, मात्र नवीन शहर वसवण्यासाठी येथील शेतजमीन संपादित केल्याने येथील शेतकरी भूमिहीन झाले.मात्र येथील खाडी शाबूत असल्याने मासेमरीचा व्यवसाय आजही सुरू आहे, मात्र याला ही येथील खाडीत प्रदूषणाचा फटका बसत असल्याने मासळीचे दुष्काळ पडत असते, असे असले तरी येथील आगरी कोळी बांधव हार न मानता पुढच्या वर्षी जाळ्याला म्हावरा मिलुदे असे साकडे घालत पौर्णिमेला दर्याराजाची यथासांग पूजा करून नारळ अर्पण करतात. त्याच पार्श्वभूमीवर बुधवारी शहरातील खाडी किनारी मोठ्या उत्साहात नारळी पौर्णिमा साजरी करण्यात आली.

यंदा ही सारसोळे कोळीवाड्यात नारळी पौर्णिमा पारंपारिक नृत्याच्या आविष्कारामध्ये नारळी पौर्णिमा साजरी करण्यात आली. यात लहान सहान मुलांपासुन ते अगदी जेष्ठ नागरीक आपल्या पारंपरिक आगरी कोळी वेशात पालखी नाचवत दर्याला नारळ अर्पण करण्यासाठी आले होते. त्यामुळे नारळी पौर्णिमा सण साजरा करताना आगरी कोळ्यांच्या उत्साहाला अक्षरशः उधाण आले होते.

या वेळी पालखी सोहळ्यामध्ये बेलापुरच्या आमदार मंदाताई म्हात्रे माजी, माजी नगरसेवक सुरज पाटील, रूपाली भगत, नगरसेविका सुजाताताई सुरज पाटील, गणेश भगत, नामदेव भगत, रतन मांडवे मनोज मेहेर आदी जन उपस्थित होते.

समुद्र शांत होण्यासाठी कोळी बांधव या दिवशी समुद्राची पूजा करतात. पूजेसाठी समुद्राला यथाशक्तीप्रमाणे सोन्याचा नारळ अथवा नारळ अर्पण करतात, असे ग्रामस्थ अमोल मेहेर यांनी सांगितले.

### दर्याराजाला नारळ अर्पण

वर्षभर आपला उदर निर्वाह करणाऱ्या व आपला सांभाळ करणाऱ्या दर्या राजाला आज नारळ देऊन पूजा केली जाते.या दिवशी सर्व आगरी कोळी बांधव आपल्या होड्यांची विधिवत पूजा करतात. त्यानंतर मासेमारीसाठी होड्या समुद्रात सोडतात.तर दर्याराजाने आपल्या सौभाग्याचं रक्षण करावे म्हणून महिला वर्ग साकडे घालतात. तर या दिवशी घरात गोड धोड नैवद्य केले जाते त्यात पुरण पोळी, करंजी यांचा मुख्य समावेश असतो.

> **आज उत्साहाचा सण जरी असला तरी रासायनिक प्रदूषणामुळे येथील खाडीत मासळीचे दुर्भिक्ष पडले आहे. त्यामुळे ज्या दिवशी नवी मुंबईतील खाडीतील प्रदूषण कमी होईल त्या दिवशी खरी नारळी पौर्णिमा साजरी होईल. त्यामुळे येथील लोक प्रतिनिधींनी या विरोधात सातत्याने आवाज उठवला पाहिजे.**
>
> **–मनोज मेहेर,**
> **अध्यक्ष,कोलवाणी मित्र मंडळ,**
> **सारसोले कोळीवाडा.**

> **नवी मुंबई शहराला सांस्कृतीक वारसा आहे. त्यामुळे आजही या शहरातील गावा गावात प्रत्येक सण मोठ्या उत्साहात आणि भक्ती भावाने साजरे केले जातात आणि त्याच पद्धतीने आज नारळी पौर्णिमा साजरी होत आहे. त्यामुळे येथील मासेमारी करणाऱ्या आगरी कोळी बांववांच्या जाळ्यात भरपूर मासळी पडूदे व इथला समाज अधिक सुखी आणि समृद्ध होऊदे हीच दर्यदेवाला प्रार्थना.**
>
> **–आमदार मंदा म्हात्रे**

## मोहोपाड्यात नेत्रतपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, खालापूर तालुका पत्रकार संघ आणि आर झुनझुन वाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन मोहोपाडा मुख्य बाजारपेठेतील श्री दत्त मंदिराच्या सभामंडपात सोमवारी करण्यात आले होते. या शिबिरात १३८ नागरिकांनी मोफत नेत्र तपासणी केली. यात २३ नागरिकांना मोतिबिंदूचा त्रास असल्याचे दिसून आले.

दरम्यान, आरोग्यविषयक अनेक शिबिरे होत असतात, परंतू नेत्र चिकित्सा व तपासणी शिबिर क्वचित आयोजित करण्यात येतात. नेत्र चिकित्सासाठी खुप खर्च येत असतो. नेत्र चिकित्सा शिबिर यशस्वी करण्यासाठी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण जाधव, खालापूर पत्रकार संघाचे अध्यक्ष राकेश खराडे, डॉ. प्रकाश पाटील आदींनी परिश्रम घेतले. या वेळी १३८ जणांची नेत्र तपासणी झाली,१७ जणांना मोफत चष्मा वाटप केले, तर नेत्र तपासणीत ज्यांना शस्त्रक्रीया करण्याची आवश्यकता होती, त्या २३ जणांना आर झुन झुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांनी स्वखर्चाने पनवेल येथे घेऊन गेले.

या शिबिराचे आयोजन केल्याबद्दल पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट आणि पत्रकार संघाचे नागरिकांनी आभार मानले.

# कुटुंबिनी उरण महिला संघातर्फे मंगळागौर स्पर्धा

**उरण : वार्ताहर**

कुटुंबिनी उरण महिला संघाच्या वतीने नुकतेच मंगळागौर स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यात एकूण ७५ उत्साही स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.



कुटुंबिनी उरण महिला संघाच्या अध्यक्षा श्लोक पाटील यांनी उपस्थित मान्यवर आणि उपस्थित महिलांचे आभार मानले. ह्या मंगळागौर स्पर्धेत एकूण आठ ग्रुपने सहभाग घेतला. त्यात रणरागिणी गृप (ठाणे), हिरकणी गृप (नागाव, उरण), मैत्रीचा श्वास गृप (ठाणे), क्रांती महिला मंडळ गृप (जासई), युफोरिया फिटनेस स्टुडिओ गृप (उरण), शिवदुर्गा महिला मंडळ (जासई), वर्षा फिटनेस गृप (उरण), पर्पल फ्लॅमिंगो गृप (मुळेखंड) आदी ग्रुप नी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत पहिले बक्षीस वर्षा फिटनेस गृप, दुसरे बक्षीस हिरकणी गृप, तिसरे बक्षीस जोगेश्वरी गृप यांना देण्यात आले. याचबरोबर २० महिलांनी ह्यात बक्षीस पटकावलीत त्यात बेस्ट वेशभूषा, उखाणा, सहवारी, नऊवारी इत्यादी प्रकारात बक्षीस देण्यात आली.

ह्या स्पर्धेचे परीक्षण पल्लवी शिंदे, शेफाली शिंदे, हेमलता वैशपायन, श्रुष्टी शिंदे यांनी केले. या वेळी कुटुंबिनी महिला संघाच्या अध्यक्षा श्लोक पाटील, उपाध्यक्षा दर्शना गावंड, माजी अध्यक्षा आरती ढोले, सचिव दीपिका माळी, उपसचिव वृषाली पवार, नयना धोत्रे, खजिनदार शुभांगी शिंदे, उपखजिनदार, प्रियंका घरत, जनसंपर्क प्रिया मयेकर, सल्लागार निशा म्हात्रे, सदस्या गायत्री माळी, अवंती साळवी, पूर्वी कोशे, रिद्धी पाटील, पूर्वी कोशे, सविता डेरे, संगीता साळुंखे आदींचे सहकार्य मिळाले. ह्या स्पर्धेचे निवेदन विदुला कुलकर्णी ह्यांनी केले.



उलवे नोड : आगरी कोळी बांधवांतर्फे शहरात नारळी पौर्णिमा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

## स्व. बाजीराव परदेशी यांची शोकसभा



**उरण : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा जिल्हा परिषदेतील काँग्रेसचे पक्ष प्रतोद दिवंगत बाजीराव परदेशी यांचे २४ ऑगस्ट २०२३ रोजी आकस्मिक निधन झाले आहे. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी त्यांच्या चिरनेर-खारपाडा महामार्गावरील निवासस्थानी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

अत्यंत शोकाकूल वातावरणात पार पाडण्यात आलेल्या या जन सामान्यांच्या कार्यासाठी अहोरात्र तत्परता दाखविणाऱ्या नेत्याच्या कार्याची यशोगाथा उपस्थितांसमोर मांडतांना बहुतांशी वक्त्यांना अश्रू अनावर झाले.

अजात शत्रू मानले जाणाऱ्या परदेशी यांच्या शोकसभेसाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रासह तालुक्यातील स्वयंसेवी संस्थाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित दर्शविली होती. शोकसभेसाठी सर्वपक्षीय नेते तसेच परदेशी यांचे कुटुंबीय, हितचिंतक आणि पंचक्रोशीतील जनसामान्य नागरिक या शोकसभेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीबर्ड स्पेशल स्कूल रक्षाबंधन कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने मंगळवारी (दि.२९) एक्स्टेंशन एक्टिविटी (विस्तारित उपक्रम) अंतर्गत ब्रह्मानंद प्रतिष्ठान संचलित आणि अपंग कल्याण विभाग पुणे संलग्नित उरण सीबर्ड स्पेशल स्कूल येथे मंगळवारी रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमात हिंदी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना राखी बांधून त्यांना शालोपयोगी भेटवस्तू व खाऊच्या पॅकेटचे वाटप करण्यात आले. खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी ची जाणीव ठेवून हिंदी विभागामार्फत हा स्तुत्य उपक्रम राबविला गेला. दिव्यांग असलेल्या या विद्यार्थ्यांनी आपल्यातील कला – गुण विद्यार्थ्यांसमोर सादर करून एक आदर्श ठेवला. बौद्धिक क्षमता कमी असलेल्या या मुलांना स्वयंपूर्ण बनवून समाजात आत्मसन्मानाने जगता यावे यासाठी त्यांचे शिक्षक पल्लवी मॅडम, राकेश सर हे विशेष मेहनत घेतात.

महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात एकूण ३० विद्यार्थी सहभागी झाले होते. अतिशय आनंदमयी व उत्साहाच्या वातावरणात कार्यक्रम झाला. महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. पी.जी. पवार साहेब तसेच हिंदी विभाग प्रमुख डॉ. झेलम झेंडे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन या उपक्रमासाठी लाभले. या वेळी हिंदी विभागाच्या सहायक प्राध्यापिका डॉ. सुजाता पाटील उपस्थित होत्या.



## तुर्भे येथे रक्तदान शिबिरात २२६ बाटल्या रक्त संकलित

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे संयुक्त सरचिटणीस तथा अजित पवार समर्थक नवी मुंबईचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते चंद्रकांत पाटील यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त तुर्भे येथे रक्तदान शिबिरासह अन्य समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे २२६ बाटल्या रक्त संकलित झाले.

महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनच्या माध्यमातून माथाडी भवन येथे माथाडी कामगारांचे नेते नरेंद्र पाटील आणि शशिकांत शिंदे, तसेच शेकडो माथाडी कामगार यांच्या उपस्थतीमध्ये चंद्रकांत पाटील यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

या वेळी चंद्रकांत पाटील यांच्या राम-तुलसी निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात विभागातील जेष्ठ नागरिकांचा सत्कार झाला. तसेच इयत्ता दहावी व बारावीच्या ४५ गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. चंद्रकांत पाटील हे दि कंजुमर प्रोडक्ट ड्रीस्ट्रीब्युशन असोशिएशनचे प्रमुख सल्लागार आहेत. या असोशिएशनच्या माध्यमातून कोपरखैरणे येथे स्त्री मुक्ती संघटनेच्या कार्यक्रमात



पाटील यांच्या पत्नी कविता पाटील यांच्या हस्ते १२० हून अधिक कचरावेचक महिलांना शिधा वाटप करण्यात आला. तुर्भे गाव येथील डी.आर.पाटील प्राथमिक विद्यालयात वह्या वाटप करण्यात आल्या.

## अम्रिता घरत ठरल्या रायगड श्रावणसम्राज्ञी

**पनवेल : वार्ताहर**

दिशा कल्चरल इव्हेंट्स प्रस्तुत दिशा महिला मंच यांच्यावतीने रायगड श्रावणसम्राज्ञी २०२३ स्पर्धेचे आयोजन बेलेझा बँक्वेट हॉल, खांदा कॉलनी याठिकाणी करण्यात आले होते. या स्पर्धे ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून अंतिम २१ स्पर्धकांमध्ये ही स्पर्धा झाली.



या स्पर्धेच्या अम्रिता कांबळे घरत या विजेत्या ठरल्या तर द्वितीय चित्रा कदम व तृतीय क्रमांक रितू दशोरे यांनी पटकावला. या स्पर्धेतील इतर १९ स्पर्धकांना टायटल, शॅस व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले या स्पर्धेला आर. के. ग्रुपचे राजेंद्र कोळकर व पनवेल मधील सामाजिक क्षेत्रातील. सचिन वासकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. डॉ. स्वाती वारे व राहुल इंगळे यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पहिले. या स्पर्धेचे मार्गदर्शन एक्स्पर्ट सनी अग्रवाल व कोरिओग्राफर पुनम शेलार व नीलिमा सहाणे यांनी केले. दर आठ मिनिटाला कॅन्सर मुळे एक महिला दगावली जाते कॅन्सर विषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने कार्यक्रमातून मॅसेज देण्यात आला व विनस वूमन्स हॉस्पिटलच्या डॉ. श्वेता भालेराव यांनी कॅन्सरविषयी माहिती दिली.

या वेळी आर के ग्रुप, यशोदा हॉस्पिटलच्या स्नेहलता खडबडे, दामाजी गणपत गोवारी हायस्कूल चे सूरदास गोवारी, रांगोत्सव सेलेब्रेशन चे संग्राम दाते, शर्वरी एंटरप्रायझेस च्या शर्वरी पटणे, क्रॉउनिंग पार्टनर तसेच मॅजिक पिटारा स्कूलच्या मुख्याध्यापिका राजेश्री कपूर, सहकारी ऋतुजा कदम, सुप्रिया मॅडम तसेच हर्ब अँड ग्लो चे कल्पेश सोमैया, मनीषा सोनावणे, ग्लोरी ब्युटी पार्लरच्या पूजा कुटे, हर्षला योगेश तांबोळी, सामाजिक कार्यकर्ते सुनिल गोवारी, दिलीप पाटील, विजय चिपळेकर, तुलसी ज्वेलर्सचे गणेश परमार, रेणुका डिसूझा, ऐश्वर्या मोहिते फ्रोजन फूडच्या अश्विनी ढोके, प्रतीक चव्हाण यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

सूत्रसंचालन स्वाती पांचाळ व संस्थेच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी केले व आभार खुशी सावर्डेकर यांनी मानले. पुढेही असेच महिलांच्या कलागुणांसाठी व्यासपीठ व वेगवेगळे उपक्रम राबवले जातील असे संस्थापक निलम आंधळे यांनी या वेळी सांगितले.

## उरण महाविद्यालयाला ओएनजीसीतर्फे साहित्य भेट

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयाला ओएनजीसी प्लांट उरण यांच्याकडून एकूण रुपये ८,१६३० किमतीची कॅम्पुटर व प्रिंटर भेट देण्यात आली.

कॅम्पुटर लॅबच्या उद्घाटनावेळी उरण ओएनजीसीचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर प्लांट मॅनेजर सुबोध बोस, यांनी विद्यार्थ्यांनी टेक्नॉलॉजीचा वापर करून अपडेट राहावे व आपले भविष्य उज्वल करावे या उद्देशाने ओएनजीसी ने ही मदत केल्याचे सांगितले. महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी या कम्प्युटरचा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मोठा उपयोग होणार असून विविध क्षेत्रातील ज्ञानग्रहणासाठी त्याच्या विद्यार्थी उपयोग करतील असे सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. के. ए. शामा यांनी केले. या वेळी महेश चंदा गौतम (चीफ जनरल मॅनेजर, एम एम सपोर्ट मॅनेजर), प्रवीण घरत (डेप्युटी जनरल मॅनेजर एचआर, इन्चार्ज एस्टॅब्लिशमेंट), गौरव पतंगे (मॅनेजर एचआर इन्चार्ज सी एस आर), इत्यादी अधिकारी, रमेश ठाकूर (सदस्य महाविद्यालय विकास समिति), प्रा. व्ही. एस. इंदुलकर, आय क्यु ए सी समन्वयक प्रा. डॉ.ए.आर. चव्हाण, ऑफिस सुप्रिटेंडेंट श्री तानाजी घ्यार, सर्व शिक्षक शिक्षकेत कर्मचारी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. हन्नत शेख यांनी मानले.

रामप्रहर श्रावणधारा

### सरवन जेला

(आगरी बोलीतील कविता)

**जेला कोठं लहरी पाऊस**
**वाट पहात अजूक धरती**
**नदी न वाहये न वाहे इरा बी**
**सुकं कोरड अवती भवती**

**आभाळाला साद घालतय**
**कुणी बापुडा शेतावरती**
**झरझर येवो धार ढगाची**
**एकच आशा धरतय माती**

**अजूक समंदी कोरडी खलाटी**
**सरवन जेला असाच फसवून**
**लहरी राजा तसाच पाऊस**
**भरोशावरी नकोच राहुस**

**पड रं पान्या साद घालती**
**तहानलेली समंदी शेते**
**मिरीग जेला आनी रोहीणी**
**मघा बोलती नंतर येते**



**–डॉ. अविनाश पाटील,**
**खांदा कॉलनी, पनवेल**

# नागोठणेलगतचा ऐतिहासिक पूल धोकादायक

## पूल नव्याने उभारण्याची भाजप नेते किशोर म्हात्रे यांची मागणी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ते वरवठणे गावाला जोडणाऱ्या ऐतिहासिक पुलाने सुमारे ४०० वर्षांचा टप्पा पार केला आहे. इंग्रजांच्या काळापासून वाहतूक सुरू असलेल्या या पुलाचा नागोठणेवरून रोहा, मुरूड, म्हसळा, श्रीवर्धन या तालुक्यांमध्ये जाताना प्रवासी शॉर्टकट म्हणून वापर करतात, मात्र दरवर्षी होणाऱ्या अतिवृष्टीमुळे पूर येऊन हा पूल जीर्ण झाला आहे.



पुलाच्या संरक्षक कठड्याला तसेच आधार देणाऱ्या खांबांना भेगा जाऊन हा पूल कमकुवत झाला आहे. त्यामुळे सध्यातरी हा पूल प्रवाशांसाठी धोकादायक बनला आहे.

या ऐतिहासिक पुलावरून सततच्या जाणाऱ्या प्रवासी वाहनांमुळे देखील पुलावरील रस्त्याची अवस्था दयनिय झाली आहे. या पुलावरून दररोज वरवठणे, एमआयडीसी वसाहत, आमडोशी, वांगणी, काळकाई, वाडा या गावांमधून अनेक नागरिक आणि शाळकरी मुले मोठ्या संख्येने नागोठणे बाजारपेठेत येतात, परंतु या पुलाची अवस्था भीतीदायक झाली असल्याने व पुलाला भक्कम संरक्षक कठडे नसल्याने या अरुंद पुलावर केव्हाही अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यासाठी गेली अनेक वर्षे भाजप नेते राष्ट्रीय जनहित कामगार कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष किशोर म्हात्रे यांनी वारंवार शासनाकडे पाठपुरावा केला होता, तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडेदेखील या पुलाविषयी मागणी केली होती. पुलाला मंजुरीदेखील मिळाली, मात्र पुरातत्त्व विभागाचा या पुलाच्या बांधकामासाठी विरोध होत आहे, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे पुरातत्त्व विभागाने केवळ विरोध न करता आपल्या खात्यामार्फत लवकरात लवकर हा पूल बांधून द्यावा, अशी मागणी केली आहे अन्यथा भविष्यात होणाऱ्या भयानक अपघातास संपूर्णपणे पुरातत्व विभाग जबाबदार असेल, असे त्यांनी सांगितले.

---

**निवडक**



### विद्यार्थ्यांनी बांधल्या पोलिसांना राख्या

**माणगाव** : बहिण भावाच्या पवित्र नात्याचा सण म्हणजे रक्षाबंधन, मात्र सदैव ऑन ड्युटी असलेल्या सैन्यदलातील जवान आणि पोलीस कर्मचाऱ्यांना रक्षाबंधनासह इतर सण साजरा करता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन मंगळवारी (दि. २९) एक राखी देशासाठी या उपक्रमांतर्गत राजिप शाळा विकास कॉलनी येथे पोलीस बांधवांना राखी बांधण्यात आली. या वेळी पोलीस खात्यातील शिवराज बांडे व बाळू बोरकर उपस्थित होते. विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या राख्या पोलीस निरीक्षक वासुदेव देसले, इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बांधल्या. वाहतूक पोलिसांनादेखील राखी बांधून ओवाळण्यात आले. या वेळी शिक्षिका खेमनार खेमणार, गायकवाड आदी उस्थित होत्या.

### हिरवळ महाविद्यालयात अनोखे रक्षाबंधन



**माणगाव** : चला जाणूया नदीला या शासनाच्या उपक्रमाला प्रोत्साहन देण्याकरिता व तरुण पिढीमध्ये याविषयी जनजागृती करण्याकरिता हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांच्या संकल्पनेतून रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्टच्या अध्यक्ष सपना शेठ यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राखी बांधून नदी संवर्धनाचे, तिच्या संरक्षणाचे वचन सर्वांकडून घेतले. या उपक्रमासाठी रोटरी फाउंडेशनचे प्रदीप शेठ, हिरवळ प्रतिष्ठानचे सदस्य गणेश खातू, हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे सेक्रेटरी संतोष बुटाला, हिरवळ महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम आदी उपस्थित होते.

### माणगाव काळ नदीत सापडला मृतदेह

**माणगाव** : शहरातील काळ नदीमध्ये अंदाजे ४० वय वर्षे असलेल्या व्यक्तीचा मृतदेह सापडला आहे. माणगाव पोलिसांना काळ नदीमधून एक मृतदेह वाहत आल्याची माहिती मिळाली. साळुंके रेस्क्यू टीम व माणगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. साळुंखे रेस्क्यू टीमच्या साह्याने काळ नदीपात्रातून हा मृतदेह बाहेर काढण्यात आला. मृतदेह माणगाव येथील राहुल मोरे यांचा असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. हे रेस्क्यू कार्यादरम्यान नदी पुलावर एकच गर्दी जमली होती. त्यामुळे पुलावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. पुढील तपास माणगाव पोलीस करीत आहेत.

---

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा -डॉ. भरत बास्टेवाड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गणेशभक्तांनी गणेशोस्तव साजरा करताना केंद्रीय प्रदूषण मंडळाने यापूर्वी दिलेल्या सूचनांचे पालन करून उत्सव पर्यावरणपूरक साजरा करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे. याबाबत ग्रामपंचायत स्तरावर करावयाच्या उपाययोजनांची माहिती तालुकास्तरावर पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. देशात पर्यावरणपूरक सण साजरे करण्याच्या दृष्टीने केंद्रीय प्रदूषण मंडळाने १२ मे २०२० रोजी मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांची जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**पर्यावरणपूरक गणेशोत्सवोसाठी उपाययोजना**

शाडूच्या मातीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करावी, सजावट करताना प्लास्टिक, थर्माकोलचा वापर न करता पाने, फुले व इतर नैसर्गिक वस्तूंचा वापर करावा, उत्सवात लाऊडस्पिकरचा आवाज मर्यादित ठेवावा, निर्माल्य मंगल कलशात टाकून त्यातून सेंद्रिय खताची निर्मिती करावी, गणेशोत्सव मंडळांनी पर्यावरणविषयक जनजागृती करावी, गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करावे.

## डॉ. बालाजी केंद्रे यांना आदिवासी मित्र पुरस्कार

**माणगाव** : आदिवासी समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक, संस्कृतीक, सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात त्यांच्या उन्नतीसाठी निजामपूर भागात अहोरात्र काम करणाऱ्या निजामपूर विभागातील वैद्यकीय सेवा पुरवणारे डॉ. बालाजी केंद्रे यांना आदिवासी जागतिक दिनाच्या कार्यक्रमात आदिवासी मित्र पुरस्काराने गौरविण्यात आले.

एकलव्य सेवा सामाजिक विकास सेवा संस्था व माणगाव तालुका आदिवासी कातकरी सेवा संस्था पुरस्कृत या संघटनेच्या विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. त्यांच्या या गौरवाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून निजामपूर ग्रामपंचायत सरपंच राजाभाऊ रणपिसे, माजी सरपंच बाळाराम दबडे, माजी सरपंच शुभांगी दबडे तसेच माजी सरपंच भाई जोशी व आदिवासी संस्थेचे विविध मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## चोचिंदे गावात जनावरांसाठी रोगप्रतिबंधात्मक लसीकरण

**महाड : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली संलग्न श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ संचालित कृषि महाविद्यालय आचळोली, ग्रामीण कृषि जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत चोचिंदे या गावी जनावरांसाठी रोगप्रतिकारक शिबिर घेण्यात आले.



डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली संलग्न श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ संचालित कृषि महाविद्यालय आचळोलीमार्फत २०२३-२०२४ आणि राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम, पशु वैद्यकीय अधिकारी महाड यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच महाड तालुक्यातील मौजे गाव चोचिंदे येथे जनावरांसाठी रोगप्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरात लंपी या आजाराचे लसीकरण जनावरांना करण्यात आले. यामुळे जनावरांची रोगप्रतिकारक क्षमता वाढण्यास मदत होते हे लक्षात घेऊन या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वेळी डॉ. अश्विनी पाडळकर पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती महाड व त्यांचे सहाय्यक तसेच चोचिंदे गावातील सर्व पशुपालक शेतकरी बंधू उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी चोचिंदे ग्रामपंचायत सरपंच अमृता अमित सावंत, उपसरपंच विश्वास गेनू पवार, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी मोलाचे सहकार्य केले.

कृषि महाविद्यालय आचळोलीचे प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. एस. सी. होळकर व कार्यक्रम अधिकारी प्रा. व्ही. आर. पवार, प्रा. एस. एस. सकपाळ पशुसंवर्धन व दुग्धशस्त्र विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीदूत चेतन गवळी, महेश वगरे, अविष्कार मेंगडे, प्रणव डांगे, आकाश गायकवाड, निखिल बेद्रे, ओम पवार, जितेश खराडे आदींनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

---

## गावच्या विकासात ग्रामविकास महत्त्वाचा भाग -संदीप कराड



**चौक : प्रतिनिधी**

गावच्या सुखदु:खात, विकासात ग्रामविकास हा महत्त्वाचा आणि अविभाज्य भाग असल्याने ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी आणि कर्मचारी यांचे सर्व ठिकाणी योगदान आवश्यक आहे. त्यामुळे हे सर्व गावची लाईफलाईन आहेत. ही लाईफलाईन थांबता कामा नये, असे आवाहन खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी केले.

१९ जुलै रोजी इर्शाळवाडीची दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेनंतर तेथील मदत व पुनर्वसन कार्यात ग्रामविकास विभागाचा महत्त्वाचा वाटा होता. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. त्यांच्या कार्याची दखल घेणे क्रमप्राप्त आहे अशी जाणीव ग्रामसेवक संघटना डीएन १३६ यांना झाल्याने ग्रामसेवक संघटनेच्या वतीने कर्मचाऱ्यांचा सन्मान गटविकास अधिकारी संदीप कराड व अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी गटविकास अधिकारी संदीप कराड पुढे म्हणाले की, इर्शाळवाडी घटनेनंतर तालुक्यातील १६ वाड्यांच्या मदत व पुनर्वसन कार्यात ग्रामसेवक व कर्मचारी यांनी अहोरात्र मेहनत घेतली. यापुढे प्रत्येक कामात आपण अग्रेसर राहिले पाहिजे.

या कार्यक्रमास सगविअ राजपूत, गटशिक्षण अधिकारी चोरमोळे, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, महादेव शिंदे, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष प्रशांत कदम, कोकण सचिव प्रमोद पाटील, रायगड कार्याध्यक्ष संतोष पवार, तालुका सचिव अजय फोफेरकर यांच्यासह ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत व पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## गणेशोत्सवात सुरळीत वीज व्यवस्थेसाठी विशेष मोहीम

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील वीज व्यवस्था सुरळीत करण्यासाठी महावितरण विभागाकडून रोज सकाळी १० ते दुपारी २ या दरम्यान वीज खंडित केली जाणार आहे. शहरात ३७ ट्रान्सफॉर्मर आहेत. प्रत्येक ट्रान्स्फार्मरवरील लघुदाब वाहिनीवरील असणारी घरगुती व वाणिज्य, औद्योगिक ग्राहकांना अखण्डित वीज पुरवठा मिळण्यासाठी मुख्य वाहिनीची गणेशोत्सवापूर्वी सर्व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यासाठी महावितरणकडून हा निर्णय घेण्यात आला आहे.



काही दिवसांपूर्वी पाच पाळीव जनावरे वीजेच्या तारेचा धक्का लागून दगावली होती. त्यामुळे अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी विविध उपाययोजना आखण्यात येत आहेत. अधीक्षक अभियंता इब्राहिम मुलाणी यांच्या आदेशान्वेय व कार्यकारी अभियंता रोहा यांच्या सूचनेनुसार उपकार्यकारी अभियंता यांच्या अधिपत्याखाली रोज सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी वीज खंडित करून दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. नागरिकांनी महावितरणच्या या मोहिमेस सहकार्य करावे तसेच प्रत्येक ग्राहकाने अधीकृत वीज कनेक्शन घेऊन महावितरणकडे रितसर अर्ज करावा त्वरित वीज कनेक्शन देण्यात येणार आहे. कोणीही वीज चोरी करू नये, असे आवाहन उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी केले आहे.

## चंद्रकांत कांबळेंच्या मारेकऱ्यांना अटक करा

### पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना रिपाइंचे निवेदन



**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या रोहा तालुक्यातील कोलाडनजिक असलेल्या तिसे रेल्वेफाटकावर आंबेडकरी बहुजन चळवळीतील कार्यकर्ते व गेटमन म्हणून कर्तव्यावर असलेले चंद्रकांत कांबळे यांची २१ ऑगस्ट रोजी दुपारी हत्या करण्यात आली. या घटनेला आठ दिवस पूर्ण होत आले आहेत, मात्र आरोपींना अटक करण्यात रायगड पोलीस अपयशी ठरल्याने बुधवारी (दि. ३०) रायगड जिल्हा रिपाइंचे अध्यक्ष नरेंद्र गायकवाड, युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडिक यांच्या नेतृत्वात रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

चंद्रकांत कांबळे हत्या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी आवश्यक ती पथके, अत्याधुनिक यंत्रणा व वरिष्ठ अनुभवी अधिकारी तपासकामी मेहनत घेत आहेत. लवकरच या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात रायगड पोलीस यशस्वी होतील असे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी उपस्थितांना आश्वासित केले.

स्व. चंद्रकांत कांबळे यांच्या निवासस्थानी रिपाइं शिष्टमंडळाने सांत्वनपर भेट देऊन कुटुंबियांच्या कायम पाठीशी उभे असल्याचे आश्वस्त केले. या वेळी एम. डी. कांबळे, रवींद्रनाथ ओव्हाळ, संतोष गायकवाड, राहुल सोनावळे, सुनील सप्रे, विनोद जोशी, लक्ष्मण सताने, जगदीश वाघमारे, सुदिन शिर्के व अन्य प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

---

## नवगावच्या बोरेश्वरच्या मंदिरात श्रावणी सोमवार सप्ताह

**अलिबाग : प्रतिनिधी**

नवगावमध्ये सोमवारी (दि. २१) श्रावणी सोमवारी सप्ताहाला सुरुवात झाली. बोरेश्वरच्या मंदिरात आपले नवस फेडण्यासाठी सात दिवस देवळात राहून आपले नवस फेडत असतात. त्यात महिलांचा मोठ्या प्रमाणत सहभाग असतो.

आठवडाभर बोरेश्वरच्या मंदिरात विविध भजन मंडळांच्या भजनाच्या मैफिलिंचा सप्ताह असतो. ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या नवेदर नवगाव येथील श्री बोरेश्वर महाराजांच्या सप्ताहा नंतर दुसऱ्या श्रावणी सोमवारी निघालेल्या श्री बोरेश्वर महाराजांच्या पालखीला भाविकांनी उपस्थिती लावली होती.

शिवशंभूचा गजर आणि हर हर महादेवगर्जना टाळ-मृदुंगाचा गजर आणि गुलालाची उधळण अशा थाटात नवेदर नवगाव येथील श्री बोरेश्वर महाराजांची पालखी सकाळी ८ वाजता निघाली होती. श्री बोरेश्वर महाराजांच्या मंदिरात श्रावणाच्या सुरुवातीपासून महादेवाची आराधना केली जाते. जागृत देवस्थान असणाऱ्या श्री बोरेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी श्रावणातच नव्हे तर एरव्हीदेखील भाविक येत असतात. वर्षभर मंदिरात रोज आरती होत असते. आरती साठी गावातील पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित असतात श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी ही पालखी निघत असल्याने या पालखीला अनन्य साधारण महत्त्व असून या पालखीला तालुक्यातील भाविकांनी आपली हजेरी लावली होती.



नवेदर नवगाव येथे परंपरेनुसार यंदाही श्रावणातील सोमवारी श्री बोरेश्वराच्या मंदिरात सप्तहा बसला होता. या सप्ताहाला नवगावकरांसह अन्य परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून बोरेश्वराचे स्तुतीगान केले. नवगावकरांची बोरेश्वरावर श्रद्धा असल्याने आपल्या बोटी समुद्रात मासेमारीसाठी उतरण्यापूर्वी ते बोरेश्वराला साकडे घालतात की हे बोरेश्वर महाराज आमचे रक्षण कर आमचा धंदा हा जीवावर उदार होऊन आम्ही करीत असतो, असे साकडे घालून मग बोटी समुद्रात मासेमारीसाठी उतरवल्या जातात.

या पालखीसोबत गावातील सहा भजनी मंडळे व दोन महिला भजनी मंडळे देखील पालखी सोबत असतात, तसेच भाविकांना थिरकण्यास लावणारे नवगाव गावातील तीन बँड पथक होते. या बँड पथकाचे विशेष म्हणजे या बँड पथकात तरुण मुलींचा सहभाग होता. मुलीसुद्धा आता चांगल्या बँड वाजवतात. या मुलींचे बँड पथक बघण्यासाठी तालुक्यातून मोठ्या प्रमाणत गर्दी जमा झाली होती. गुलालाच्या उधळणीत श्री बोरेश्वराची पालखी संपूर्ण नवगावमध्ये फिरून पुन्हा बोरेश्वराच्या मंदिरात येऊन मंदिरात आरती झाली, अशा प्रकारे श्री बोरेश्वर महाराजांचा पालखी सोहळा झाला.

## मुरूडमध्ये यंदा सुपारीला एक मणास ६२०० रुपयांचा भाव

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुका सुपारी खरेदी विक्री संघ व सुधा गॅस वितरण व्यवस्थेची वार्षिक उलाढाल सुमारे ३० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. सहकारी तत्वावर चालणारा व कोकणातील मोठी आर्थिक उलाढाल असणारा सुपारी संघ आहे. सुमारे १६००च्या वर सभासद संख्या आहे. सुपारी संघातर्फे यंदा सुपारीला एक मणास ६२०० रुपये भाव देण्यात आला आहे. याबाबत सर्व सभासदांनी समाधान व्यक्त केले आहे.



चेअरमन बाबा दांडेकर यांनी, सर्व सभासदांच्या विचारविनिमयाने यंदा बागायतदारांना ६२०० रुपये भाव देण्यात आला आहे. गणपती सणापूर्वी सर्व सभासदांना पैसे मिळावेत यासाठी पैसे वाटप करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सुपारी बागायतदारांनी जेवढी सुपारी संघाकडे दिली आहे तेवढे संपूर्ण पैसे अदा करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

# टीम इंडिया श्रीलंकेत दाखल

## दोन दिवस सराव; शनिवारी पाकिस्तानविरोधात होणार सामना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशिया चषकाला बुधवारपासून दिमाखात सुरुवात झाली आहे. भारतीय संघही आशिया चषकासाठी श्रीलंकेत दाखल झाला आहे. केएल राहुल बेंगलोरमध्येच दुखापतीवर काम करणार आहे. आशिया चषकातील पहिले दोन सामने टीम इंडिया राहुलशिवाय खेळणार आहे. त्यामुळे पाचव्या क्रमांकावर कोण फलंदाजी करणार? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.



विराट कोहली, कर्णधार रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह यांच्यासह संघातील सर्वच सहकारी श्रीलंकेत पोहचले आहे. तिलक वर्मा आणि रविंद्र जाडेजा यांनी श्रीलंकेला रवाना होण्यापूर्वी सोशल मीडियावर फोटो पोस्ट केले होते.

आशिया चषकात भारताचा पहिला सामना शनिवारी पाकिस्तानविरोधात होणार आहे. त्या आधी भारतीय संघ दोन दिवस सराव करणार आहे. श्रीलंकेला रवाना होण्यापूर्वी तिलक वर्मा आणि रविंद्र जाडेजा यांनी फ्लाईटमधील फोटो पोस्ट केले आहेत. तिलक वर्मा याने सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या फोटोमध्ये कुलदीप यादव आणि सूर्यकुमार यादवही दिसत आहेत. आशिया चषकासाठी टीम इंडियामध्ये तिलक वर्मा याला संधी दिली आहे. तिलक वर्मा याने वेस्ट इंडिज दौर्‍यामध्ये टी२० मध्ये दमदार कामगिरी केली होती.

तिलक वर्मा याने पदार्पणातच सर्वांना प्रभावित केले. आशिया चषकात तिलक वर्मा याचे वनडेमध्ये पदार्पण होण्याची शक्यता आहे. तिलक वर्माने आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली होती. त्यामुळे त्याची टीम इंडियात वर्णी लागली. तिलक वर्मा भारतासाठी एक्स फॅक्टर ठरू शकतो.

### आशिया चषकासाठी भारताचा संघ

रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, केएल राहुल (विकेटकिपर, दुखापतीमुळे दोन सामन्याला मुकणार), श्रेयस अय्यर, हार्दिक पांड्या, रविंद्र जाडेजा, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शामी, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव, इशान किशन (विकेटकिपर), अक्षर पटेल, शार्दुल ठाकूर, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, प्रसिद्ध कृष्णा, संजू सॅमसन (बॅकअप विकेटकिपर)

# १०० मीटर धावणे शर्यतीत सानिका राऊत, गौरव पाटील प्रथम

**अलिबाग : प्रतिनिधी**



राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल नेहुली अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत मुलींमध्ये सानिका संदीप राऊत हिने तर मुलांमध्ये गौरव महेंद्र पाटील याने प्रथम क्रमांक मिळवला.

नेहरू युवा केंद्र, युवा कार्यक्रम खेल मंत्रालय भारत सरकार, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग व प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल नेहुली अलिबाग येथे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी डॉ. मेघा घाटे, अ‍ॅड. कला पाटील, अ‍ॅड डॉ. निहा राऊत, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, नेहरू युवा केंद्र जिल्हा युवा समन्वयक निशांत रौतेला, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्ष तपस्वी नंदकुमार गोंधळी, स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा तथा स्पर्धा विश्व अ‍ॅकॅडमीच्या संचालिका सुचिता काशिनाथ साळवी, पंच म्हणून मेश्राम सर, शुभम बाटे, पोलीस विभागात कार्यरत असणारे पोलीस नाईक ऋषिकेश साखरकर, आकाश गोळे, करण पाटील, समीर धुरी, चेतन वेळे आदी मान्यवर व असंख्य खेळाडू उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वी होण्याकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे तालुका क्रीडा अधिकारी सचिन निकम, सिद्धांत खंडागळे, सुरेंद्र पाटील, प्रिझम संस्थेच्या शितल म्हात्रे, स्पर्धा विश्व अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थी प्रतिनिधी पूर्वा सचिन नाईक, साक्षी संतोष पाटील यांनी परिश्रम घेतले.

**स्पर्धेचा निकाल**

१. गोळा फेक :- मुली : प्रथम सेजल शरद घरत, द्वितीय सेजल संतोष राऊत, तृतीय रिया राजेश गुंजाळ; मुले : प्रथम साहिल महेश पाटील, द्वितीय कुणाल रमाकांत पाटील, तृतीय स्वराज सुरेश मांडवकर.

२. १०० मीटर धावणे :- मुली : प्रथम वैष्णवी विशाल पाटील, द्वितीय भूमी आशय म्हात्रे, तृतीय आस्था शेखर लाड; मुली लहान गट : प्रथम तनश्री निलेश पेरेकर, द्वितीय मानसी गणेश ठाकूर, तृतीय सौम्य प्रवीण केणी; मुले : प्रथम वंश प्रमोद थळे, द्वितीय रुद्र राजेंद्र कडवे, तृतीय आयान ललित कुमार कदम; खुला गट मुले : प्रथम गौरव महेंद्र पाटील, द्वितीय मिहीर संदेश घरत, तृतीय साहिल पाटील; खुला गट मुली : प्रथम सानिका संदीप राऊत, द्वितीय सेजल शरद घरत, तृतीय कथा अतुल वाडकर.

३. १६०० मीटर धावणे : खुला गट मुले : प्रथम धीरज रवींद्र पाटील, द्वितीय ऋतिक दामोदर ठाकूर, तृतीय स्वागत समीर पाटील; मुले : प्रथम अथर्व राकेश कांबळे, द्वितीय वंश प्रमोद थळे, तृतीय रुद्र जितेंद्र कडवे.

४. ८०० मीटर धावणे : खुला गट मुली : प्रथम कथा अतुल वाडकर, द्वितीय नेहा हेमंत म्हात्रे, तृतीय सेजल शरद घरत.

# महिलांसाठी नारळ फोडी स्पर्धेत करूणा वाळंज प्रथम



**रेवदंडा : प्रतिनिधी**

नागावमध्ये अनिरूद्ध राणे मित्रमंडळ आयोजित महिलांच्या नारळ फोडी स्पर्धेत करूणा वाळंज या प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरल्या, तर द्वितीय क्रमांक परी राणे, तृतीय क्रमांक मैथली भगत, चतुर्थ क्रमांक वैष्णवी लाड यांनी पटकाविले.

नागाव येथे अनिरूद्ध राणे मित्रमंडळाचे वतीने प्रथमच महिलांसाठी नारळ फोडी स्पर्धेचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. स्पर्धेत प्रथम क्रमांकास साडी व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांकास साडी व आकर्षक चषक, तृतीय क्रमांकास साडी व आकर्षक चषक, चतुर्थ क्रमांकास साडी व आकर्षक चषक अशी बक्षिसे मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आली.

स्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांना प्रत्येकी तीन नारळ देण्यात आले होते.

# खारघरमध्ये रंगणार जिल्हास्तरीय सॉफ्ट टेनिस अजिंक्यपद स्पर्धा

**पनवेल :** रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशनतर्फे रायगड जिल्हास्तरीय सब ज्युनियर, ज्युनियर आणि सिनियर सॉफ्ट टेनिस अजिंक्यपद स्पर्धा १० सप्टेंबर रोजी विश्वज्योत हायस्कूल, खारघर येथे आयोजित करण्यात आली आहे.

लातूर येथे ३० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबरदरम्यान राज्यस्तरीय ज्युनियर सॉफ्ट टेनिस अजिंक्यपद स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी रायगड संघ या स्पर्धेतून निवडण्यात येणार आहे, तसेच महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस असोसिएशन आणि गोंदिया जिल्हा सॉफ्ट टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने गोंदिया येथे २४ ते २७ नोव्हेंबर या कालावधीत सबज्युनियर सॉफ्ट टेनिस राज्य अजिंक्यपद स्पर्धा होणार आहे. या अजिंक्यपद स्पर्धेत खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष स्वप्निल वारंगे यांनी केले आहे.

# वुमन्स लीग पिंच्याक सिलॅट स्पर्धेत नवी मुंबईतील खेळाडूंचे वर्चस्व



**पाली : प्रतिनिधी**

स्पोर्ट्स अथोरिटी ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने खेलो इंडिया वुमन्स पिंच्याक सिलॅट लीग स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशन क्राईस्ट अ‍ॅकॅडमी स्कूल कोपरखैरणे नवी मुंबई येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत दमदार खेळाचे प्रदर्शन करून नवी मुंबईच्या खेळाडूंनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

या स्पर्धेचे उद्‌घाटन नवी मुंबईचे नगरसेवक ममित चौघुले, इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले, फादर जैसन मुंबई झोन मॅनेजिंग डायरेक्टर क्राईस्ट कॅडमी स्कूल, शीतल कचरे, डॉ. प्रतीक माने, सुधीर वाडकर यांच्या उपस्थितीत पार पडला. या स्पर्धा सर्व वयोगटातील मुलींसाठी घेण्यात आल्या. स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांतील ५३५ खेळाडू सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचा सांघिक चषक, २५ सुवर्ण, पाच रौप्य, १४ कांस्य अशा सर्वाधिक पदकांसह नवी मुंबई संघाने पटकावला. त्याप्रमाणे द्वितीय क्रमांकाचा सांघिक चषक ११ सुवर्ण, नऊ रौप्य, १५ कांस्य पदकांसह सांगली संघाने पटकावला, तसेच तृतीय क्रमांकाचा सांघिक चषक १० सुवर्ण, आठ रौप्य, १३ कांस्य पदकांसह पुणे ग्रामीण संघाने पटकावला.

नामदेव शिरगावकर यांनी, खेळाडूंना मार्गदर्शन करताना पिंच्याक सिलॅट खेळाविषयी बोलताना या खेळाचा गोवा येथे होणाऱ्या ३७व्या राष्ट्रकूल स्पर्धेत समावेश झाल्याबद्दल किशोर येवले सरांचे व त्यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय कार्यकारिणीचे अभिनंदन केले आणि यामध्ये निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना सरावासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टींची मदत ही महाराष्ट्र ऑलिम्पिक आणि शासनाद्वारे केली जाईल, असे सांगितले.

# राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेत भक्ती भोईरला सिल्वर मेडल

**उरण : बातमीदार**

हरिवंश ताना भगत स्टेडियम रांची झारखंड येथे २३ ते २७ ऑगस्टदरम्यान वाको इंडिया कॅडेट आणि ज्युनियर नॅशनल किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धा झाली. किक बॉक्सिंग स्पर्धेत उत्तम कामगिरी करीत भक्ती विजय भोईर हिने सिल्वर मेडल पटकाविले आहे. तिचा या वेळी सत्कार करण्यात आला.



महाराष्ट्र किक बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रायगडचे अध्यक्ष सुधाकर घारे, जीवन ढाकवळ, दीपेश सोलंकी, पेण तालुक्यातील युथ कराटे अ‍ॅकॅडमीचे अध्यक्ष आणि कोच संतोष मोकल, पनवेल अ‍ॅकॅडमीचे कोच शैलेश ठाकूर, उरण अ‍ॅकॅडमीचे कोच विजय भोईर, कुमार, यश जोशी नॅशनल कोच यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. भक्ती विजय भोईर हिला सिल्वर मेडल मिळाल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रशिक्षक दीपक घरत तसेच विजय विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा जि. प. सदस्य विजय भोईर, विकास भोईर यांचे भक्तीला मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

भक्तीचे वडील तथा इंटरनॅशनल किक बॉक्सिंग गोल्ड मेडलिस्ट विजय भोईर यांच्या पाउलावर पाउल टाकून नेत्रदीपक यश मिळविल्याने तिच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदन वर्षाव होत आहे.

**पनवेल : रक्षाबंधनाचा सण बुधवारी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांना त्यांच्या बहिणींनी ओवाळून शुभाशिर्वाद दिले. त्याचप्रमाणे अमोघ प्रशांत ठाकूर व अपूर्व प्रशांत ठाकूर यांनाही त्यांच्या बहिणीने ओवाळले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी वर्षा प्रशांत ठाकूर यांनीही त्यांच्या भावाला ओवाळून सण साजरा केला.**







# अवघ्या एका तासात विकली भारत-पाकिस्तान वर्ल्डकप सामन्याची सर्व तिकिटे

**नवी दिल्ली :** आयसीसी विश्वचषक २०२३च्या तिकिटांची विक्री सुरू झाली आहे. वर्ल्ड कप २०२३मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ ऑक्टोबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. या सामन्याची सर्व तिकिटे अवघ्या एका तासात विकली गेली.

यंदा विश्वचषक भारतात होत असल्याने प्रत्येक भारतीयाला पाकिस्तानविरुद्ध तिरंगा फडकवायचा आहे. त्यामुळेच भारत-पाकिस्तान सामन्याबाबत चाहत्यांमध्ये वेगळाच उत्साह आहे. भारत-पाकिस्तान सामन्याच्या पहिल्या खेपेची तिकिटे तासाभरात विकली गेल्याने याचे वैशिष्ट्य दिसून आले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com